रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १४३
www.ramprahar.com

रविवार, १० डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

'विकसित भारत संकल्प यात्रा सर्वसामान्यांसाठी उपयुक्त'/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
डॉक्टर ऑलिम्पिकमध्ये दामिनी बागुल यांना सुवर्णपदक/८

## 'एनआयए'ची महाराष्ट्रात ४३ ठिकाणी छापेमारी



**मुंबई** : दहशतवादाला आळा घालण्यासाठी आणि दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) सतत सतर्क असते. या अनुषंगाने शनिवारी (दि.९) सकाळी महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील ४४ ठिकाणी छापेमारी करण्यात आली. एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार कर्नाटमध्ये एक, तर महाराष्ट्रात पुणे, ठाण्यामध्ये ४३ ठिकाणी कारवाई करण्यात आली. राज्य दहशतवादविरोधी पथक आणि एनआयए यांनी संयुक्तपणे केलेली कारवाई मोठी आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादी जाळे आणि इसिस दहशतवादी संघटनेच्या हस्तकांशी संबंधाचा कट यानिमित्ताने उघड होणार आहे. भारतात 'इसिस'च्या अतिरेकी विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी गुंतलेल्या एका मास्टरमाईंडचा या जाळ्यात समावेश होता. भारतीय भूमीत दहशतवादी करण्याचा कट या नेटवर्कने रचला होता, असे सांगितले जात आहे.

# आजारपणाच्या कारणाखाली शेकाप नेते विवेक पाटलांचा जामिनासाठी प्रयत्न सुरुच

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

## कर्नाळा बँक घोटाळ्यातील संचालक मात्र फरारी

तब्येत पूर्णपणे बरी झालेली असतानाही पुन्हा पुन्हा आपल्या आजारपणाचे कारण सांगून न्यायालयाकडून जामिन मिळवण्याचा प्रयत्न कर्नाळा बँकेचे तत्कालीन अध्यक्ष व शेकापचे माजी आमदार विवेकानंद पाटील वारंवार करीत आहेत तसेच या आर्थिक घोटाळ्याला विवेक पाटील यांच्याप्रमाणेच जबाबदार असलेले अनेक संचालक फरार असताना विवेक पाटील यांनाच न्यायालय कोणत्या न्यायाने जामिन देणार हा प्रश्नच जनतेपुढे उभा आहे.

राज्यातील माजी मंत्री नवाब मलिक यांना न्यायालयाने वैद्यकीय तपासणीसाठी नुकताच जामिन दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर आपल्यालाही जामिन मिळेल या आशेवर पूर्णपणे बरे झालेले विवेक पाटील हे आता पुन्हा न्यायालयाकडे आजारपणाचेच कारण पुढे करून जामिन मागत आहेत.



विवेक पाटील हे दुर्धर रोगाने आजारी असल्याने एप्रिल २०१९मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारापासून ते दूर होते, मात्र तेव्हा उपचार सुरू असल्याने कालांतराने ते बरे झाले आणि ऑक्टोबर २०१९ सालातील विधानसभेची निवडणूकही त्यांनी उरणमधून लढवली. या निवडणुकीत कर्नाळा बँकेतून लुबाडलेला पैसा वापरून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्नही त्यांनी केला.

कर्नाळा बँकेतील एवढा मोठा आर्थिक घोटाळा करूनही तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने विवेक पाटील यांना पाठीशी घातले आणि अटकेची कारवाई केली नाही, मात्र त्याचवेळी या आर्थिक अफरातफरीला जबाबदार असलेल्या विवेक पाटील यांना सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने अटक केलेली आहे.

यानंतर शेकापच्या कार्यकर्त्यांना मात्र 'मला आता जामिन मिळणार', असे वरचेवर सांगून त्यांच्या आशा विवेक पाटील पल्लवित ठेवत आहेत. शेकापचे कार्यकर्ते पक्षापासून दूर जाऊ नयेत म्हणून त्यांना सातत्याने भावनिक आवाहन करीत 'मी आता बाहेर येणारच', असे विवेक पाटील सांगत आहेत. त्यामुळे या बँकेच्या फरार संचालकांना ताब्यात न घेताच न्यायालय विवेक पाटील यांना जामिन देतंय का, याकडे पनवेल-उरण तालुक्यांसह रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांना यश

# दरडग्रस्त माडभुवन आदिवासीवाडीला एमआयडीसीकडून जागेचे हस्तांतरण

## पिढ्यान् पिढ्या लक्षात राहील असे कार्य -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील दरडग्रस्त माडभुवन आदिवासीवाडीच्या पुनर्वसनासाठी आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यातून एमआयडीसीने शनिवारी (दि.९) महसूल विभागाला जागा हस्तांतरण केली. या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी पिढ्यान् पिढ्या लक्षात राहिल असा कार्यक्रम आज संपन्न होत असून या सर्व कामाचे श्रेय आमदार महेश बालदी यांचे असल्याचे उद्गार काढले, तर आमदार महेश बालदी यांनी एकही आदिवासी बांधव बिनघराचा राहता कामा नये, असे प्रतिपादन करून येत्या पावसाळ्याच्या आत तुमच्या घरांचे काम चालू करण्यासाठी प्रयत्न करणार, अशी ग्वाही दिली.

आपटा ग्रामपंचायत अंतर्गत माडभुवन आदिवासी वाडीलगत असलेल्या डोंगराला पावसाळ्यात मोठ्या भेगा पडल्या होत्या. इर्शाळवाडीची पुनरावृत्ती माडभुवनवाडीत होऊ नये याची गांभीर्याने दखल घेत आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने अतिवृष्टीच्या काळात या सर्व ग्रामस्थांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर केले. दरडीचा धोका लक्षात घेऊन भविष्यात कोणतीही जीवित हानी होऊ नये यासाठी या वाडीचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करून योग्य पुनर्वसन केले पाहिजे, अशी मागणी आमदार महेश बालदी यांनी शासन व प्रशासनाकडे केली. वाडीतील ग्रामस्थ आणि प्रशासनाचे अधिकारी यांच्या सहमतीने पाताळगंगा एमआयडीसीमध्ये सारसई बागेचीवाडीजवळ पुनर्वसनासाठी जागा उपलब्ध असल्याचे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या निदर्शनात आणून देण्यात आले. मंत्री सामंत यांनी या प्रस्तावाला त्वरित मान्यता देऊन माडभुवनमधील ९७ कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी ३०० गुंठे जागा एमआयडीसीने शनिवारी महसूल विभागाला हस्तांतरित केली.

पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक हॉल येथे झालेल्या जागा हस्तांतरण कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह प्रांत अधिकारी राहुल मुंडके, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी डॉ. संतोष थिटे, तहसीलदार विजय पाटील, भाजपचे खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, **(पान २ वर..)**

# महिला, युवक, शेतकरी आणि गरजूंच्या जगण्याचा स्तर उंचावण्यासाठी कटिबद्ध -पंतप्रधान नरेंद्र मोदी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतातील प्रत्येक नागरिकाचा, गावाचा, शहराचा आणि राज्याचा विकास करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने विविध योजना हाती घेतल्या आहेत. या योजना देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचाव्यात, त्यांचा नागरिकांना लाभ मिळावा यासाठी विकसित भारत संकल्प यात्रा सुरू केली आहे. या यात्रेच्या माध्यमातून भारतातील महिला, युवक, शेतकरी, खेळाडू आणि गरजूंच्या जीवनाचा स्तर उंचावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.



विकसित भारत संकल्प यात्रेच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी (दि.९) देशभरातील विविध ठिकाणी नागरिकांशी दृकश्राव्य माध्यमाद्वारे संवाद साधला. या वेळी मुंबईत केंद्रीय सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे, शालेय शिक्षण व मराठी भाषामंत्री तथा मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार राम कदम, महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इकबाल सिंह चहल आदी उपस्थित होते.

## आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर चप्पलफेक

**इंदापूर : प्रतिनिधी**

आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर इंदापूरमध्ये शनिवारी (दि.९) चप्पलफेक झाली. सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांकडून चप्पलफेक झाल्याचा दावा केला जात आहे, मात्र मराठा समाजाने चप्पलफेक केल्याचा आरोप फेटाळला आहे.

इंदापूरमध्ये शनिवारी (दि.९) ओबीसी एल्गार मेळाव्यातील भाषण झाल्यावर आमदार गोपीचंद पडळकर प्रशासकीय भवनासमोर दूध दरवाढीच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेले शिवधर्म फाऊंडेशनचे दीपक काटे यांच्या भेटीसाठी चालले होते. शेजारी मराठा समाजाचेही उपोषण सुरू होते. त्या वेळी त्यांच्यावर चप्पलफेक झाली. या प्रकारानंतर पडळकर घटनास्थळाहून निघून गेले.

## निवडक

### देवगडच्या समुद्रात बुडून पुण्यातील चार मुलींचा मृत्यू

**सिंधुदुर्ग** : देवगड येथे सहलीला आलेल्या पुणे येथील संकल्प सैनिक अकॅडमीतील सहा पर्यटक शनिवारी (दि. ९) समुद्रात बुडाले. यातील प्रेरणा डोंगरे, अंकिता गालटे, अनिषा पडवळ, पायल बनसोडे या चार मुलींचे मृतदेह सापडले. आकाश तुपे असे वाचवण्यात यश आलेल्याचे नाव आहे, तर राम डिचवलकर हा बेपत्ता असून त्याचा शोध सुरू होता.

### चिंचवड कारखाना दुर्घटनेतील आणखी दोन जणांचा मृत्यू

**पुणे** : चिंचवडच्या तळवडे रेडझोनमधील अनधिकृत स्पार्कल मेणबत्ती तयार करणाऱ्या कंपनीत आग व स्फोटात सहा महिला कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी घडली होती. या घटनेतील १० जखमी रुग्णांवर ससून रुग्णालयात उपचार सुरू असून त्यापैकी दोन जणांचा शनिवारी (दि.९) मृत्यू झाला, तर उर्वरित आठ जणांची प्रकृती चिंताजनक आहे.

# बीसीटी विधी महाविद्यालयात पदवीदान सोहळा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात शनिवारी (दि. ९) पदवी वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे वकील डॉ. लक्ष्मण कनाल आणि संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

## मान्यवरांची लाभली उपस्थिती

पदवीदान सोहळ्यास संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळाच्या सदस्य अर्चना ठाकूर, प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख आदी उपस्थित होते.

या वेळी १८० विद्यार्थ्यांनी मान्यवरांच्या हस्ते पदवी स्वीकारल्या. प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्यांना रोख पारितोषिक आणि पदक देऊन गौरविण्यात आले. यामध्ये प्रणव ताम्हाणे, तन्वीर पटेल, सुप्रिया म्हात्रे यांनी एलएलबी तीन वर्षांच्या अभ्यासक्रमातून आणि अस्मिता मिश्रा, पूजा यादव, अलिशा पवार यांनी बीएलएस एलएलबी पाच वर्षांच्या अभ्यासक्रमातून यश मिळविले.

कार्यक्रम आयोजनात सहाय्यक प्राध्यापक अनाम मेहेंदीकर, डॉ. प्रा. हिमांशू मोरे, ग्रंथपाल जान्हवी भोईर, सायली उतेकर यांनीही योगदान दिले.

# भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या आदेशाने उत्तर रायगड कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी घोषित केली आहे.

या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी संगीता पाटील, बिनिता घुमरे, वर्षा नाईक, मोनिका महानवर, स्नेहा गोगटे; सरचिटणीसपदी अ‍ॅड.वृषाली वाघमारे, संध्या शारबिंद्रे; चिटणीसपदी अश्विनी अत्रे, दिपाली तिवारी, शिल्पा म्हात्रे; खजिनदारपदी निकिता हेलांडे, सोशल मीडिया प्रमुखपदी शामल सुरसे; तर सदस्य म्हणून सुनिता पाटणकर, अपर्णा साठे, तृप्ती चौरे, मिरा घुगे, सरोज मोरे, आदिती मराठे, विशाखा ठाकूर, नंदा म्हात्रे आदींचा समावेश आहे.

याचबरोबर उत्तर रायगडमधील महिला मोर्चाच्या मंडळ अध्यक्षांचीही घोषणा करण्यात आली. यामध्ये कर्जत नम्रता कांदळगावकर, खोपोली शोभा काटे, खालापूर सुजाता दळवी, उरण राणी म्हात्रे, पनवेल ग्रामीण निता चोणकर, पनवेल शहर राजेश्री वावेकर, कामोठे वनिता पाटील, कळंबोली मनीषा निकम, खारघर साधना पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कोण पटकावणार मानाचा अटल करंडक?

## राजस्तरीय एकांकिका स्पर्धेचा आज पारितोषिक वितरण सोहळा

## ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री मोहन आगाशे यांचा 'जीवनगौरव'ने होणार सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

*राजस्तरीय अटल करंडक स्पर्धेचा ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड झाल्यावर खूप आनंद झाला. 'सीकेटी'चा विद्यार्थी असल्याचा अभिमानही वाटला. महाविद्यालयात असताना त्या वेळी ही स्पर्धा मल्हार करंडक नावाने सुरू होती. त्यामध्ये भाग घेतला होता. त्याचे आयोजनही केले होते. त्यानंतर ही स्पर्धा अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा झाली. तिचे स्वरूप एवढे मोठे झाले की, त्यात राज्यातून १५०पेक्षा जास्त एकांकिका सहभागी होऊ लागल्या. हे वाढलेले स्वरूप पाहून खूपच छान वाटते.* **-अजिंक्य ननावरे, सुप्रसिद्ध अभिनेते**

एकाहून एक सरस अशा एकांकिका सादर होत असल्याने बहुमानाचा अटल करंडक यंदा कोण पटकावणार याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्राला लागली आहे. निमित्त आहे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये सुरू असलेल्या दहाव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे.

उत्कृष्ट नियोजन, सर्वाधिक रकमेची पारितोषिके आणि नवोदित कलाकारांना संधी यांचा मिलाप असलेल्या या स्पर्धेतून आजवर अनेक कलाकार घडले आहेत. त्या अनुषंगाने स्पर्धेने यशाची उंची गाठली. त्यामुळे दरवर्षी या स्पर्धेची कलाकार आणि रसिक आतुरतेने प्रतीक्षा करीत असतात. पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सुरू असलेल्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा रविवारी (दि. १०) सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असणार असून सन्माननीय उपस्थिती म्हणून गौरव रंगभूमी जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. मोहन आगाशे, पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, सुप्रसिद्ध उद्योजक विलास कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची उपस्थिती असणार आहे. या वेळी सुप्रसिद्ध अभिनेते विजय पाटकर, लेखक व दिग्दर्शक राजन ताम्हाणे, अभिनेते लेखक व दिग्दर्शक संजय मोने, सुप्रसिद्ध अभिनेते भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्यनिर्मात्या कल्पना कोठारी, स्पर्धेचे ब्रॅण्ड अँबेसिडर सुप्रसिद्ध अभिनेता अजिंक्य ननावरे आदींची आदरणीय उपस्थिती असणार आहे.

या स्पर्धेच्या तीन दिवसीय अंतिम फेरीसाठी दर्जेदार अशा २५ एकांकिकांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी शुक्रवार व शनिवारी १९ एकांकिका सादर झाल्या, तर उर्वरित एकांकिका रविवारी सादर होतील. या एकांकिकांचा आणि पारितोषिक वितरणाचा नाट्यरसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते व अटल करंडक स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, अटल करंडक आयोजन कमिटी उपाध्यक्ष विलास कोठारी, स्पर्धा सचिव व सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील यांनी केले आहे.



**पनवेल : महापालिका आणि दिलीप वेंगसरकर फाउंडेशनच्या वतीने नवीन पनवेल येथील राजीव गांधी मैदानात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत आहे. या केंद्राचे काम वेगाने सुरू असून माजी क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी अधिकाऱ्यांसह पाहणी करून संबंधितांना आवश्यक त्या सूचना केल्या. या वेळी उद्योजक राजू गुप्ते, महापालिकेचे अधिकारी संजय कटेकर, ठेकेदार समत अग्रवाल आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)

# विकसित भारत संकल्प यात्रा सामान्यांसाठी उपयुक्त -केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील

**ठाणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन संपूर्ण भारतात करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक गरजू लाभार्थ्याचा शोध घेणे, त्याला योजनांची माहिती देणे, त्याला प्रत्यक्ष लाभ तत्काळ देणे, या प्रकारचे काम सुरू आहे. लोकांच्या अपेक्षापूर्तीसाठी शासन आणि शासकीय यंत्रणा अहोरात्र प्रयत्नशील आहे. ही यात्रा सर्वसामान्यांसाठी उपयुक्त आहे, प्रतिपादन केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी केले.




भिवंडी तालुक्यातील काल्हेर ग्रामपंचायत येथे आयोजित विकसित भारत संकल्प यात्रा व पंतप्रधान महोदयांचा दूरदृश्यप्रणालीद्वारे लाभार्थ्यांशी थेट संवाद या कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांनी या वेळी १ जानेवारी २०२४पासून ठाणे जिल्ह्यातील ४५२ ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता अभियान राबविले जाणार असल्याची घोषणाही केली.

या वेळी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गोपीनाथ ठोंबरे, प्रकल्प संचालक डॉ. छायादेवी शिसोदे, भिवंडी प्रांताधिकारी अमित सानप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक कुटे, दूरदर्शन संचालक सिद्धार्थ बोडके, तहसीलदार अधिक पाटील, जि. प. महिला व बाल विकास अधिकारी संजय बागूल, आरोग्य संचालनालयाचे सहायक संचालक डॉ. चाकूरकर, केंद्रीय संचार ब्युरो, पुणेचे प्रबंधक डॉ. जितेंद्र पानपाटील, गटविकास अधिकारी प्रदीप घोरपडे, स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

राज्य उत्पादन शुल्कमंत्री तथा पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासन हे सर्वसामान्यांकरिता काम करणारे शासन आहे. विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासकीय यंत्रणा थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचत आहे.

प्रत्येक गरजू लाभार्थ्याचा शोध घेतला जात आहे. त्याला योजना समजावून सांगितली जात आहे आणि त्याचा प्रत्यक्ष लाभही दिला जात आहे. यामुळे लाभार्थ्यांना होणारा त्रास आता होत नाही. यातून एक बाब निश्चितपणे सिद्ध झाली आहे की, हे शासन केवळ घोषणा करणारे नसून थेट कामच करणारे शासन आहे, असे प्रतिपादन केले.

# विकसित भारत संकल्प यात्रेला उरण शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद

**उरण : वार्ताहर**

केंद्रातील मोदी सरकार तसेच उरण नगर परिषदेचा माध्यमातून विकसित भारत संकल्प यात्रा आणि विविध केंद्र सरकार तसेच राज्य सरकारच्या विविध योजनांचा सरळ लाभ उरण नगर परिषदेमधील नागरिकांना व्हावा, यासाठी भव्य लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरात मोफत आयुष्मान भारत कार्ड, आधार कार्ड नोंदणी आणि आधार विविध प्रकारच्या त्रुटी सुधारणा, उज्ज्वला योजना, मुद्रा योजना, पीएम स्वनिधी योजना यांच्या सरळ लाभ ४००हून अधिक लाभार्थ्यांनी घेतला.

या वेळी नगर परिषदेतर्फे मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रमुख उपस्थिती नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी नगरसेवक कौशिक शहा, भाजप तालुकाप्रमुख रवी भोईर, जयविन कोळी, नंदू लांबे व ओएसडी जगदानी, सुरेश पोसतांडेल, झेड. आर. माने आदी उपस्थित होते.

नगर परिषद कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रमाने शिबिर आयोजित केले होते. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा सरळ लाभ मिळाल्यामुळे अनेक नागरिकांनी केंद्र सरकार तसेच नगर परिषदेचे आणि कर्मचारीवृंदाचे आभार मानले.



# रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघातर्फे सुधारित एनपीए निकषांवर चर्चा




**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील नागरी तथा ग्रामीण सहकारी पतसंस्थांना एनपीएबाबत सुधारीत निकष लागू करणे, ठेवींचे दायित्व स्विकारताना जिंदगीची निर्मिती करण्याबाबत सीआरएआर या निकषांवर रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघातर्फे चर्चा करण्यात आले.

जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघातर्फे गुरुवारी (दि. ७) येथील हॉटेल गुरुप्रसाद सभागृहात जिल्ह्यातील निवडक पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांसाठी चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील अध्यक्षस्थानी होते. जिल्ह्यातील २५ पतसंस्थांचे प्रतिनिधी या बैठकीत सहभागी झाले होते.

या वेळी प्रमुख अतिथी अलिबाग सहाय्यक निबंधक श्रीकांत पाटील, जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील, उपाध्यक्ष दिलीप जोशी, सचिव योगेश मगर, राज्य फेडरेशनचे सदस्य सुरेश पाटील, जिल्हा फेडरेशनचे संचालक अमित ओझे, चंद्रकांत घोसाळकर, जगदीश कवळे प्रकाश चांदिवडे तसेच पतसंस्थांचे अध्यक्ष प्रमोद पाटील, सतिश पाटील, शेखर वागळे, अशोक प्रधान, अभिजित पाटील, मानसी कर्वे, राजाराम पाटील आदी उपस्थित होते.

श्रीकांत पाटील यांनी, बँकिंग व्यवसायात स्पर्धा अटळ असली तरी योग्य व्यवस्थापन केल्यास आर्थिक स्थैर्य लाभू शकते. तथापि क्रेडीट रिस्क, ऑपरेशनल रिस्क आणि मार्केट रिस्कची परिमाणे अचूक जोपासली पाहिजेत. याकडे लक्ष वेधून संचालकांसह कर्मचारी वर्गांनी प्रशिक्षण घेतले पाहिजे, असा सल्ला दिला. ॲड जे. टी. पाटील यांनी स्वनिधी, मुक्त व विकास निधी, निव्वळ नफा, उत्पादित गुंतवणूक, अनुत्पादित कर्ज, स्थावर मालमत्ता आदींवर चर्चा घडवून आणली. विविध पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनांचे तसेच सीआरएआरवर सुधारणा सूचविल्या.

रायगड जिल्ह्यातील सहकार चळवळ पुढे नेण्यासाठी फेडरेशन कार्यरत असून एनपीएसह उपयुक्त सूचनांचे निवेदन सहकार आयुक्तांना पाठविण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन योगेश मगर यांनी केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात ८ व ९ डिसेंबर रोजी एमर्जिंग ट्रेंड्स इन कॉमर्स अँड सायन्स या विषयावर दोन दिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते.



या परिषदेत मुंबई व वेगवेगळ्या राज्यातील सुमारे १३० संशोधकांनी त्यांची नोंदणी केली होती. त्यातील काही संशोधकांनी त्यांचे संशोधन लेख ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीने सादर केले. या परिषदेसाठी आलेल्या भारतातील व भारताबाहेरील प्रमुख वक्ते व सल्लागार मंडळाचे सदस्य संशोधनासंदर्भात त्यांचे विचार मांडले व संशोधकांना त्यांच्या लेखांविषयी सूचना व मार्गदर्शन केले. या समारोप सोहळ्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी उपस्थित राहून या दोन दिवसीय बहुविद्याशाखीय परिषदेच्या प्रोसिडिंगचे अनावरण केले तसेच सहभागी झालेल्या संशोधकांना पार्टिसिपेशन सर्टिफिकेट तसेच बेस्ट पेपर प्रेझेंटेशन अवॉर्ड देऊन सन्मानित केले. त्यांनी संशोधकांना मोलाचे मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या दोन दिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा सारांश सादर केला व सर्व संशोधकांचे तसेच प्रमुख वक्त्यांचे आभार मानले. या वेळी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी परिषदेसाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अंकिता जागीड व प्रा. राहुल कांबळे यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. फारुख शेख समन्वयक कार्यशाळा व परिषद सर्वांचे आभार मानले.

# पेन्शन समितीच्या बैठकीत विविध मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा

**उरण : बातमीदार**

पेन्शन समितीची पहिली बैठक आयपीए, न्यू दिल्ली येथे सहा फेडरेशन आणि व्यवस्थापन यांच्यात जी. पी. राय, अध्यक्ष, मुरगांव बंदर, यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी कार्याध्यक्ष सुधीर घरत यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.



या बैठकीत पेन्शन नियमबाबतीत समिती सदस्यांनी एकमताने शिफारस केली आहे की, प्रमुख बंदरांचे पेन्शन नियम सीसीएस (पेन्शन) नियमांनुसार तयार केले जातील. पेन्शन आणि फॅमिली पेन्शन अद्यतनित करणेबाबत १ जानेवारी २०२२पूर्वी सेवानिवृत्त, मृत्यू झालेल्या पोर्ट आणि डीएलबीची पेन्शन आणि फॅमिली पेन्शन, वेतन मंडळानुसार पेन्शन देण्यात यावी असे मान्य करण्यात आले. अपंग भावंडांना फॅमिली पेन्शन देण्याबाबत सीसीएस (पेन्शन) नियमांनुसार सहमत झाले. एआईसीपीआई तिमाही निर्देशांक सरासरी वाढीनुसार महागाई सवलत दिली जाईल. सेवानिवृत्ती, मृत्यू ग्रॅच्युइटीबाबतीत जेव्हा जेव्हा डीए ५० टक्क्यांनी वाढेल तेव्हा ते २५ टक्के वाढेल. पेन्शन फंडाचे व्यवस्थापन पोर्टद्वारे करावे, पेन्शन अदालत बाबतीत सर्व बंदरांनी एक समिती गठीत करावी आणि त्रैमासिक बैठक घ्यावी, निश्चित वैद्यकीय भत्ता रु. १००० वरून रु.२०००पर्यंत वाढवले. अपंग अवलंबित मुलांना वैद्यकीय लाभ मिळणार. एनपीएएसच्या बाबतीत जेव्हा केंद्र सरकार एनपीएस २००४चे उदारीकरण करेल तेव्हा बंदरांनी ते स्वीकारले जाईल. बाहेरील वैद्यकीय उपचार बाबतीत आपत्कालीन परिस्थितीत, विद्यमान वैद्यकीय नियमांनुसार विचार केला जाईल. २०१७ पूर्वी एसवीआरएस अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या गोवा बंदरातील कर्मचाऱ्यांना एमपीटीच्या वैद्यकीय योजनेंतर्गत नोंदणी करण्याची परवानगी दिली जाईल, असे वेगवेगळ्या मुद्यांवर चर्चा झाली.

वेतन करार बैठकीत इतर अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आणि चर्चेसाठी शिफारस करण्यात आली. वेतन कराराची पुढील बैठक १८ डिसेंबर २०२३ रोजी मुंबई येथे होणार आहे, अशी माहिती सुरेश पाटील, महासचिव भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ यांनी दिली.

पान १ वरुन

## दरडग्रस्त माडभुवन आदिवासीवाडीला एमआयडीसीकडून जागेचे हस्तांतरण

माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, केळवणे जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, साई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्याधर मोकल, कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजू पाटील, विद्यमान सदस्य प्रफुल्ल पाटील, आपटा ग्रामपंचायत सदस्य असद पिट्टू, माजी सरपंच शनिवार उघडा, युवा मोर्चाचे सदस्य दिनेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, ज्ञानेश्वर भोईर, उमेश पाटील, राजेंद्र पाटील, युवा मोर्चा केळवणे पं.स. विभागीय उपाध्यक्ष सुबोध ठाकूर, भाजप कार्यकर्ता योगेश घरत यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी जातीचा दाखला अतिशय महत्त्वाचा असतो. यासाठी लवकरच कॅम्पचे आयोजन केले जाईल तसेच घेरावाडीला मूलभूत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी विभागीय स्तरावर आमदारसाहेबांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे सांगितले.

या वेळी माडभुवन येथील तरुण केशव निरगुडा याने दोन्ही आमदारांचे वाडीच्या वतीने आभार व्यक्त केले. त्याचप्रमाणे आणि सर्व महिला-पुरुष ग्रामस्थांनी पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.



# अलिबाग-पनवेल शिवशाही बसची टँकरला धडक

## पेण मार्गावर मोठी वाहतूक कोंडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-पेण मार्गावर शनिवारी (दि. ९) दुपारच्या सुमारास शिवशाही बसने मागून टँकरला धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात कुणीही जखमी झाले नाही मात्र यामुळे अलिबाग-पेण मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.





शनिवारी दुपारी अलिबागहून पनवेलकडे निघालेली विनावाहक विनाथांबा शिवशाही बस पोयनाडच्या पुढे पांडवादेवी येथे वळणावर आली असता चालकाला गाडी नियंत्रित करता आली नाही. त्यामुळे बस पुढे चाललेल्या टँकरवर आदळली. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. बसमधून तेलगळती सुरू झाली. दोन्ही वाहने रस्त्यात उभी राहिल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली होती. दोन्ही बाजूने वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या होत्या.

पांडवादेवी ते वडखळ हे १० मिनिटांचे अंतर पार करायला दीड तास लागत होता. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली.

# कर्जत दहिवलीच्या श्री विठ्ठल रखुमाई यात्रेचा प्रारंभ

## आठ दिवस चालणार यात्रा

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील दहिवली येथील पुरातन असे श्री विठ्ठल रखुमाई मंदिर हे उल्हास नदीच्या काठावर पेशव्यांचे सुभेदार पिंपुटकर यांनी वसविलेले दहिवली हे गाव आजही दिमाखाने उभे आहे. श्री विठ्ठल रखुमाई देवाची यात्रा शनिवार (दि. ९)पासून सुरू झाली असून कर्जत नगर परिषदेकडून प्राथमिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात, तर मंदिर देवस्थानकडून पुढील आठ दिवस अनेक धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.




मध्य रेल्वेच्या मुंबई-पुणे रेल्वेमार्गाच्या मध्यावर असलेल्या कर्जत स्टेशनपासून १५ मिनिटांच्या चालत जाण्याच्या अंतरावरील हे दहिवली गाव. सुभेदार पिंपुटकरांचा वाडा आणि वंशज अद्यापही या दहिवली गावात आहेत. या मंदिराच्या समोरील बाजूस सभोवती पार बांधलेले वडपिंपळाचे पुरातन वृक्ष आहे. पाराच्याजवळ मारूती मंदिर असून उजव्या बाजूला श्रीगणपती व श्रीचिंतामणेश्वराची स्वतंत्र मंदिरे आहेत. विठ्ठल मंदिरात जाण्यासाठी उंच दगडी चिरेबंदी चौपदरी कौलारू छप्पर आहे. मोठे वेणगाव येथे ते वास्तव्यास असताना पेशव्यांचे वतीने सुभेदारीण पार्वतीबाई यांनी वैशाख शुद्ध १३ शके १७१४ (इ. स. १७९२)मध्ये दहिवली गावात नविन विठ्ठल मंदिर बांधले, ज्या वेळी सवाई माधवराव पेशवे जातीने उपस्थित होते.

मंदिरातील सभामंडपात प्रवेश करून उजव्या बाजूला आत प्रवेश केल्यावर श्रीगणेशाची मूर्ती, काशी विश्वेश्वराची पिंडी, पार्वतीमाता, नंदी तसेच आतील बाजूस कोरीव काम असलेल्या लाकडी देव्हाऱ्यात विराजमान असलेल्या काळ्या पाषाणातील विठ्ठल-रखुमाईचे दर्शन होते.

कार्तिक वद्य एकादशी ते अमावास्येपर्यंत येथे यात्रा भरते आणि त्या यात्रेत पूर्वीच्या काळी वाहन म्हणून घोड्याचा वापर होत असे. त्या काळी ही जत्रा घोड्यांच्या खरेदी-विक्रीकरीता प्रसिद्ध होती, असे म्हणतात.

# पनवेल कोळखे येथे विकसित भारत संकल्प यात्रा

## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती







(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी यशस्वी रितीने व्हावी या उद्देशाने संपूर्ण देशात केंद्र आणि राज्य शासनाद्वारे विकसित भारत संकल्प रथयात्रा आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत पनवेल तालुक्यातील कोळखे येथे विकसित भारत संकल्प यात्रेचा कार्यक्रम भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर तसेच आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. ९) ग्रामपंचायत कार्यालयात झाला.

या कार्यक्रमावेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या हस्ते आभा कार्ड तसेच महिला आणि बालकल्याण विभागाच्या वतीने सुदृढ बालक स्पर्धेतील विजेत्या महिलांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते धनंजय विसपुते, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, पंचायत समितीचे अधिकारी डॉ. सुनील नखाते, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे, कोळखे ग्रामपंचायतीच्या सरपंच मिलन म्हात्रे, मालडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सीताराम चौधरी, उपसरपंच जनार्दन निरगुडा, भिंगार ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक गायकर, माजी सरपंच योगेश लहाणे, सदस्य सुनील पाटील, कोळखे ग्रामपंचायतीचे सदस्य राजेश सुरते, अंबो ढवळे, माजी उपसरपंच मंगेश म्हात्रे, सदस्य नाझीर शेख, सदस्या लाझमीर पठाण, राजेश सुरते, गटविकास अधिकारी संजय भोये, माजी सदस्य गोटीराम ढवळे, अपेक्षा जाधव, सारिका सुरते, युवा मोर्चा उपाध्यक्ष महेश पाटील, मिलिंद सुरते, केळवणे जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, रामदास खेत्रे, माया सुरते, मिलिंद सुरते, राजेश भोईर, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात प्रिन्सिपल केबिन व कॉन्फरन्स रूमचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयातील वकील डॉ. लक्ष्मण कनाल यांच्या हस्ते आणि संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारिणी मंडळाच्या सदस्य अर्चना ठाकूर, प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख आदी उपस्थित होते.**



## पनवेलमध्ये क्षेत्रस्तरीय भारत को जानो स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद संस्थेच्या वतीने पनवेलमध्ये क्षेत्रस्तरीय भारत को जानो स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. १०) सीकेटी महाविद्यालय येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, उद्योजक आतिष कुलकर्णी यांची उपस्थिती लाभणार असून स्पर्धेचे उद्घाटन भारत विकास परिषदेचे राष्ट्रीय संघटन मंत्री सुरेश जैन यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

भारत विकास परिषद ही एक राष्ट्रव्यापी अराजकीय सामाजिक संस्था आहे. संपर्क, सहयोग, संस्कार, सेवा आणि समर्पण या पंचसुत्रावर आधारीत संस्थेचे विविध उपक्रम राबविले जातात. संस्कार उपक्रमांतर्गत गुरूवंदन छात्र अभिनंदन, राष्ट्रीय समूहगान स्पर्धा आणि भारत को जानो प्रश्नमंजुषा असे तीन कार्यक्रम शालेय व शाखा स्तरावर घेण्यात येतात. यामध्ये पनवेल तालुक्यातील अग्रगण्य असलेल्या बहुतांश शाळा सहभागी होतात.

क्षेत्रस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजनामध्ये कोकण प्रांताचे प्रतिनिधित्व यावर्षी भारत विकास परिषद पनवेल शाखा करित आहे. स्पर्धेसाठी मुंबई, पश्चिम-महाराष्ट्र, कोकण, गोवा, विदर्भ, देवगिरी, सौराष्ट्र आणि गुजरात अशा आठ प्रांतांचे ज्युनिअर व सिनियर गटातून प्रत्येकी दोन विद्यार्थी प्रतिनिधित्व करतील. पनवेलमध्ये अशा स्पर्धांचे आयोजन प्रथमच करण्यात येत आहे. पनवेलमधील विद्यार्थी, पालकांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन शाखेच्या अध्यक्ष डॉ. कीर्ती समुद्र, सचिव पद्मजा कुलकर्णी, कोषाध्यक्ष शितल विचारे व संस्कार प्रोजेक्ट समन्वयक ज्योती कानिटकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## घरफोडी करणाऱ्या सराईतांना अटक; पोलिसांकडून मुद्देमालही हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील खारपाडा नाका येथील एका मोबाईल इलेक्ट्रिक दुकानात घरफोडी करून जवळपास एक लाख ३० हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून घरफोडीचा मुद्देमाल मोठ्या प्रमाणात हस्तगत केला आहे.



येथील भरत मोबाईल व इलेक्ट्रिक दुकानाच्या छताचा पत्रा फोडून अज्ञात चोरट्याने दुकानातील एक लाख २९ हजार ६०० रुपये किमतीच्या इलेक्ट्रिक वस्तू, मोबाईल व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय गळवे, पोलीस हवालदार विजय देवरे, पोलीस हवालदार महेश धुमाळ, पोलीस हवालदार सुनील कुदळे व पोलीस शिपाई आकाश भगत आदींच्या पथकाने तपासाची चक्रे फिरविली.

या गुन्ह्यातील आरोपी अदिल मजिबूर शेख (वय २१) व मुस्तकीम उमर फारुख शेख (वय २२) हे दोघे मुंब्रा परिसरात लपले असल्याची माहिती मिळाल्याने या पथकाने सापळा रचून या दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे व त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## मालाची ठरलेली रक्कम न दिल्याने गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

माल घेऊन त्याची ठरलेली रक्कम परत न करणाऱ्या व चेक बाऊन्स केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विनोद कुमार बंसल हे खारघर सेक्टर ३४ ए येथे राहत असून त्यांचा विजय स्टील नावाने पळस्पे फाटाजवळ कोळखे गाव येथे व्यवसाय आहे. मे २०२३मध्ये शोएब खान आणि ऋषी हे दुकानावर येऊन त्यांनी इमरान खान यांच्यासोबत एमआय ट्रेडिंग नावाने स्टीलचा व्यवसाय करीत असून स्टीलची आवश्यकता असून अ‍ॅडव्हान्स पेमेंट देऊन बिल्डिंग बांधण्यासाठी लागणारे स्टील खरेदी केले. जून २०२३मध्ये फोनद्वारे संपर्क साधून ३९ हजार ६४ हजार ६५ रुपये किमतीचे स्टील मावगले. त्यांनी दोन दिवसांनी पेमेंट करतो असे सांगितले. या मालाचे पेमेंट न केल्याने संपर्क साधला असता सतत उडवाउडवीची उत्तरे दिली व पेमेंट करण्यास टाळाटाळ करू लागले. विनोद कुमार बंसल हे मिरा रोड येथे इमरान खान याला भेटले असता समोरील पार्टीकडून पेमेंट येण्यास अडचण येत असल्याचे सांगितले. त्यांनी नोटरी कराराप्रमाणे चेक दिला मात्र तोदेखील बाऊन्स झाला आहे. विनोद कुमार बंसल यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच इमरान खान, शोएब खान आणि ऋषी यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महिलेचे गंठण खेचून चोरटा पसार

**पनवेल** : कामोठे येथे नातेवाईकाला पाहण्यासाठी आलेल्या एका महिलेच्या गळ्यातील चार लाख रुपये किमतीचे दोन सोन्याचे गंठण स्कुटीवरून आलेल्या एका चोरट्याने खेचून नेले. कामोठे पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

पळस्पे येथील कोळखेपेठ भागात राहणाऱ्या या प्रकरणातील तक्रारदार विजया सुरते (४८) या नातेवाईकाला भेटण्यासाठी पतीसोबत दुचाकीने कामोठे येथे आल्या होत्या. सुरते दाम्पत्य कामोठे सेक्टर-१८ मधील गोकुळ डेअरीसमोर फळ घेण्यासाठी थांबले होते. या वेळी अचानक त्यांच्या समोरुन हेल्मेट घालून आलेल्या एका चोरट्याने विजया सुरते यांच्या गळ्यातील दोन लाख ८० हजार किम्मतीचे मोठे, तसेच एक लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे लहान गंठण असे एकूण चार लाख रुपये किमतीचे दोन सोन्याचे दागिने खेचून पलायन केले.

## भाजप सोशल मीडिया आणि आयटी सेलची बैठक





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे कोकण विभाग सोशल मीडिया प्रभारी देवांग दवे यांचा कोकण दौरा सुरू आहे. या दौऱ्यांतर्गत भाजप विधानसभा मंडळच्या सोशल मीडिया आणि आयटी सेलच्या संयोजक आणि पदाधिकाऱ्यांची बैठक पनवेलमधील भाजप मध्यवर्ती कार्यालयात शनिवारी (दि. ९) झाली.

या वेळी आगामी काळात होणाऱ्या निवडणुका आणि त्या वेळी पक्षाची भूमिका या विषयावर देवांग दवे यांनी मार्गदर्शन केले तसेच सोशल मीडिया आणि आयटी पदाधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेतला.

या बैठकीस भाजप सोशल मीडिया उत्तर रायगड जिल्हा संयोजिका अ‍ॅड. गायत्री परांजपे, आयटी जिल्हा संयोजक नितेश सोलंकी, पनवेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, जिल्हा सहसंयोजक नितेश थळे, खारघर संयोजक अजय माळी, कामोठे संयोजक प्रवीण वाघमारे, कळंबोली संयोजक संकेत सावंत, अ‍ॅड. चेतन जाधव यांच्यासह सहसंयोजक आणि सदस्य उपस्थित होते.

या बैठकीनंतर दवे यांनी वॉररुमला भेट दिली. या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील हेदेखील उपस्थित होते.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात शनिवारी (दि. ९) शालांतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता आठवी ते दहावी या मध्यम गटासाठी विद्यार्थ्यांचे गट करून प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना रयत शिक्षण संस्थेसंबंधी, जनरल नॉलेजसंबंधी, चालू घडामोडी, तसेच भौगोलिक स्थळे, काही घटना, क्रीडाक्षेत्र, गणित व विज्ञानातील प्रश्न विचारून प्रश्नमंजुषेच्या अनेक फेऱ्या घेण्यात आल्या. बझर फेरीही घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्वक या सर्व फेऱ्यांमध्ये आपला सहभाग दाखविला.

इयत्ता दहावीतील गट प्रथम क्रमांकाने विजयी झाला. या गटात विद्यार्थी कोमल इरळे, आर्यन वाघमारे व तनिष्का म्हात्रे यांनी सहभाग घेतला, तर उपविजेतेपद इयत्ता आठवी वर्गाने पटकावले. या गटात वैभवी सोमासे, चिन्मय महाले, वेदिका देशमुख यांनी सहभाग घेतला.


स्पर्धेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे, शिक्षक जे. एस. ठाकूर, एस. डी. पाटील, पी. आर. पवार, व्ही. व्ही. गावंड, व्ही. बी. मोकाशी यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या, गुरुकुल प्रमुख तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या स्पर्धेचे गुणलेखक म्हणून मोकाशी व्ही. बी. यांनी काम पाहिले.

# अटल करंडक एकांकिका स्पर्धा मोठी होतेय हे पाहून खूप छान वाटते!

### सुप्रसिद्ध सिनेअभिनेते अजिंक्य ननावरे यांचे गौरवोद्गार

**पनवेल : नितीन देशमुख**

सुप्रसिद्ध मालिका व सिनेअभिनेते अजिंक्य ननावरे यांनी, अटल करंडक २०२४ स्पर्धेचा ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड झाल्यावर खूप आनंद झाल्याचे सांगून मी स्वतः चांगू काना ठाकूर (सीकेटी) शिक्षण संकुलाचा विद्यार्थी असल्याचा अभिमानही वाटल्याचे सांगितले. महाविद्यालयात असताना त्या वेळी ही स्पर्धा मल्हार करंडक नावाने सुरू होती. त्यामध्ये भाग घेतला होता. त्याचे आयोजनही केले होते. त्यानंतर मल्हार



करंडक ही स्पर्धा अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा झाली. तिचे स्वरूप एवढे मोठे झाले की, त्यात राज्यातून १५०पेक्षा जास्त एकांकिका सहभागी होऊ लागल्या हे वाढलेले स्वरूप पाहून खूपच छान वाटते, असे नमूद केले.

माझ्या कॉलेजने, संस्थेने व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने मला परत एकदा ही संधी दिली, व्यासपीठ दिले त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. व्यावसायिक रंगभूमीवर काम करताना असलेली ऊर्जा वेगळी असते. आपण जेव्हा एखादी एकांकिका उत्स्फूर्तपणे तयार करून लोकांपुढे सादर करीत असतो त्याची एक वेगळी ऊर्जा, वेगळा उत्साह असतो, धाकधूक असते ती आज ही इथे दिसते. ते मला आवडले. आम्ही जेव्हा एकांकिका करायचो तेव्हा आमच्या आजूबाजूचे विषय, आम्हाला भावणारे प्रॉब्लेम असायचे. त्यांना धरून आम्ही एकांकिका करायचो. आज इथे पाहताना जाणवते की, ही सगळी मुले तसेच विषय घेऊन सगळ्यांसमोर आली आहेत, असे अजिंक्य ननावरे यांनी सांगितले.

मी माझ्या महाविद्यालयीन जीवनात अनेक स्पर्धा केल्या. आजही मी अनेक एकांकिका स्पर्धा बघतो, पण या स्पर्धेचे, आयोजनाचे स्वरूप दरवर्षी भव्य होत आहे. त्यांचा आवाका खूप वाढत जात आहे. येणाऱ्या सहभागी मुलांसाठी लागणाऱ्या सोयीसुविधा गरजेच्या असतात. इतर ठिकाणी त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही, परंतु ही संस्था सगळ्या गोष्टीची काळजी घेऊन व्यवस्थित नियोजन करते. त्यामुळे या स्पर्धेसाठी मला पुन्हा बोलावले तर मी घरच्या कार्यक्रमासारखा आवर्जून येईन, असे ननावरेंनी म्हटले.

### बालकलाकार आरव आहिरने जिंकली मने

राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेत शनिवारी सादर झालेल्या 'ढ' मंडळी कुडाळच्या 'ढीम टँग, ढीटँग' या एकांकिकेतील आरव सुरेश आहिर या बालकलाकाराने सगळ्यांची मने जिंकून घेतली. स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर अजिंक्य ननावरे यांनीही त्याचे कौतुक करून त्याला शुभेच्छा दिल्या.

कुडाळच्या शाळेत दुसरीत शिकणाऱ्या आरवला लहानपणापासून नृत्याची आवड असल्याने तो नृत्य स्पर्धेत भाग घ्यायचा. एका स्पर्धेच्यावेळी त्याची विठ्ठल तळवटकर यांच्याशी ओळख झाली. त्यांनी त्याच्यातील गुण ओळखले. गावच्या कल्लेश्वरच्या जत्रेत डान्स करणारा आराव आज प्रथमच एकांकिका स्पर्धेतील आपला अभिनय करीत होता, असे पाहणाऱ्याला वाटतही नव्हते.

आरव सांगतो की, त्याच्या आईने पूर्वी नाटकात काम केले होते. आता ती नाटकात काम करीत नाही. घरीच शिलाईची कामे करते. वडील मुंबईत इलेक्ट्रिशियनची कामे करतात. त्याच्या मोठ्या भावालाही डान्सची आवड आहे. त्याच्या शाळेनेदेखील त्याला परवानगी दिली आहे. तो शाळेतून घरी आल्यावर संध्याकाळी या एकांकिकेच्या तालमींना जायचा. आता तो 'वेतोबा' या सिरियलमध्ये आपल्याला दिसणार आहे. त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!

## गाना, बजाना, नाचना...

# पब्लिकची एन्जॉयमेंट

आपण स्वतः घेतलेला अनुभव मनात कायमच घर करून राहतो... मी शालेय वयात दक्षिण मुंबईतील अप्सरा थिएटरमध्ये आमच्या गल्लीतील सवंगड्यांसोबत धर्मा (रिलीज ३० नोव्हेंबर १९७३) हा मसालेदार मनोरंजक डाकूपट एन्जॉय करायला गेलो असतानाचा हा भन्नाट अनुभव.

त्या काळात असे ढिश्यॅव दिश्यॅव दे मार मारधाड पिक्चर्स म्हणजे 'तिकिटाचा पैसा वसूल'. अशातच पडद्यावर प्राण आणि बिंदू यांच्यावरची राज की बात कहदू तो जाने महफिल मे फिर क्या हो कव्वाली सुरू होताच हाऊसफुल्ल गर्दीतील पब्लिकने टाळ्यांचा ताल धरला आणि चक्क काहींनी पडद्यावर चिल्लर पैसे उडवायला सुरुवात केली. एकाने पैसे उडवलेले पाहून दुसरा उडवू लागला. एक भारीच एन्जॉयमेंट. फार पूर्वीदेखील असं काही घडायचं आणि सुपर हिट गाण्यावर फिदा होत पडद्यावर पैसे उडवत हे ऐकून होतो, पण आपण स्वतः घेतलेला अनुभव आठवला तरी भारी वाटतं.

'धर्मा'ला पन्नास वर्ष पूर्ण होत असतानाच मला हे पटकन आठवलं. बाकी पिक्चर सूडकथा होती. पटकथेत अनेक वळणे होती. नवीन निश्चल, रेखा (चक्क डबल रोलमध्ये), अजित, रमेश देव इत्यादी अनेक कलाकार यात आहेत. सिल्व्हर ज्युबिली हिट पिक्चर आहे. एका कव्वालीवर पिक्चर हिटची किमया घडली.

गीत, संगीत व नृत्य ही आपल्या देशातील जवळपास सर्वच सणांतील खासियत आणि तीच आपल्या हिंदीसह सर्वच प्रादेशिक भाषेतील चित्रपटांची संस्कृती. म्हणूनच तर गाणी आणि पब्लिक रिस्पॉन्स या घट्ट नातेसंबंधाची गोष्ट भारीच आहे.

मला आठवतय, 'आराधना'मधील मेरे सपनों की रानी कब आयेगी तू आणि रूप तेरा मस्ताना ही गाणी त्या काळात रेडिओ विविध भारतीवर जयमाला प्रोग्राम, रेडिओ सिलोनवर बिनाका गीतमालामध्ये, गिरगावातील एखाद्या गल्लीतील कुठच्याश्या कार्यक्रमातील लाऊडस्पीकरवर ऐकायला मिळत. रॉक्सी थिएटरमध्ये दिवसा तीन खेळ अशी रौप्यमहोत्सवी वाटचाल केल्यावर तेथेच काही आठवड्यांनी दिवसा दोन खेळ 'यादगार' (मनोजकुमार व नूतन) व दिवसा दोन खेळ 'आराधना' असं केलं. आता थिएटर डेकोरेशन बदलताना काय केले? तर चक्क मेरे सपनो की रानी... गाण्याचा देखावा. त्या गाण्यातील ट्रेनमध्ये पुस्तक वाचत बसलेली शर्मिला टागोर आणि उघड्या जीपमधील राजेश खन्ना (जोडीला सुजीतकुमार) असा फंडा. गंमत म्हणजे थिएटर डेकोरेशनवरील सुपर हिट गाण्याचा असा देखावा पाहण्यातही आनंद मिळे. हिट गाणं असंही आपलं अस्तित्व दाखवे.

पिक्चरमधील गाणी ऐकणे/ पाहणे/ गुणगुणणे यासह मस्त गोष्ट. सत्तरच्या दशकाच्या मध्यास मास्टर भगवानदादा यांचा 'अलबेला' (१९५१) रिपीट रनला प्रदर्शित होताना अनेक गोष्टी घडल्या. पोस्टरवर गाण्याचे मुखडे वाचायला मिळाले. भोली सूरत दिल के खोटे, श्याम ढले खिडकी तले तुम शिट्टी बजाना छोड दो, शोला जो भडके दिल मेरा धडके... जुन्या पिढीतील




चित्रपट रसिकांना 'अलबेला' पुन्हा एकदा पहावासा वाटला, तर तेव्हा शालेय वयातील आम्हा चित्रपट रसिकांचेही याच गाण्यांमुळे 'अलबेला'विषयी कुतूहल वाढले. मीडियातील या पिक्चरवरचा फ्लॅशबॅक फारच रंजक. इंपिरियल थिएटरमध्ये फर्स्ट रनला 'अलबेला' रिलीज झाल्यावर पहिले दोन आठवडे काहीसा थंडा रिस्पॉन्स होता. खुद्द भगवानदादा थिएटरवर जाऊन 'पब्लिक रिस्पॉन्स'चा कानोसा घेत. हळूहळू गाणी अशी काही हिट झाली की गोकुळाष्टमी, गणेशोत्सात कच्ची बाजात हुकमी ठरली. सुपरड्युपर हिट गाणे फक्त पडद्यावरच राहत नाही, ते असं समाजातील विविध स्तरांवर रुजते. गाणी चित्रपटाच्या व्यक्तीमत्वाचा महत्त्वाचा भाग.

देव आनंदच्या अनेक खासियतीमधील एक पटकन डोळ्यांसमोर येणारी गोष्ट, गाण्यात तो कमालीचा एकरूप होई. आणखी एक विशेष त्याचे तेरे घर के सामने, तीन देवियां, गॅम्बलर, प्रेम पुजारी, तेरे मेरे सपने या फिल्म फर्स्ट रनला थिएटरमधून लवकर उतरल्या तरी त्यातील गाणी रेडिओपासून इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्सपर्यंत पुन्हा पुन्हा ऐकली जात होती. ऑर्केस्ट्रात हुकमी होती. फक्त हे पिक्चर्स मॅटीनी शोला येण्याचा बेसब्रीसे इंतजार होता. एकेक करीत तसे आले नि यातील गाण्यांसाठीच ते मॅटीनी शोला हाऊसफुल्ल झाले. लोकप्रिय गाणी कधीच आपली साथ सोडत नाहीत त्याचं हे एक भारी उदाहरण. रेडिओवरील 'भुले बिसरे गीत' कार्यक्रम अशा जुन्या गाण्यांना जुन्या नवीन पिढीला तीच गाणी ऐकवे.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

'जय संतोषी मा' (मुंबईत रिलीज ३० मे १९७५)ने सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, माध्यम वातावरण ढवळून काढल्याच्या दिवसांत ग्रामीण भागात 'मै तो आरती उतारू रे' ही पडद्यावरची आरती सुरू होताच प्रेक्षक चक्क चप्पल काढून उभे राहत असा किस्सा भारीच प्रसिद्ध झाला. या पिक्चरची गाणी समाजाच्या विविध स्तरांवर लोकप्रिय झाली.

सत्तरच्या दशकात थिएटर डेकोरेशनवर एखाद्या गाण्यातील पोझ हे जणू कॉमन होतं. ऑपेरा हाऊस थिएटरवर डेकोरेशनला भारीच स्कोप. 'अमर अकबर अॅन्थनी'च्या डेकोरेशनवर परदा है परदा, माय नेम इज अॅन्थनी गोल्सानवीस यांना चांगलेच स्थान दिल्याचे आठवतेय. पिक्चर पाह्यला असेल तर हे डेकोरेशन पाहून पुन्हा पहावासा वाटायला हवाच. चित्रपट कला व माध्यम आणि त्याच वेळेस लोकप्रियता व व्यवसाय यांची एकमेकांत सांगड ही अशीच भारी.

'राम तेरी गंगा मैली' (मिनर्व्हावर), 'सागर' (न्यू एक्सलसियरला), तेजाब (ड्रीमलॅन्ड), राम लखन (मेट्रो), 'सौदागर ' (मेट्रो) अशी सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या दिवसांतील आठवणी सांगाव्यात तेवढ्या थोड्याच. तुमच्याही डोळ्यांसमोर अशी 'पोस्टरवरची आणि थिएटर डेकोरेशनवरची अनेक गाणी' आली असतील. ते पाहूनच तुम्ही गुणगुणला असाल.

'हम आपके है कौन 'च्या लिबर्टीतील डेकोरेशनवरही दीदी तेरा देवर दीवाना या गाण्यातील बेचकी धरणारा सलमान खान व ओपन बॅक चोलीतील मोहक मादक माधुरी होती. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांना लिबर्टीची फर्स्ट शोची बाल्कनीची तिकीटे दिली होती. दोन मध्यंतर हा अनपेक्षित सुखद धक्काच (आठवडाभरात ते एकच केले.. ती स्टोरी वेगळीच) आणि दिदी तेरा देवर गाण्याला पडद्याभोवती अचानक रोषणाई लागली. लख्ख प्रकाश पडला. हे काही वेगळेच होते. थिएटरमधील वातावरण बदलून गेले. एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. पिक्चर हिटमागचे हे छान फंडे आहेत. ते हवेतच. व्यवसायात कल्पकता हवीच. चित्रपट क्षेत्रात तर नक्कीच!

पडद्यावर गाणं येते नि जाते असं नेहमीच घडत नसते. (तो एक वेगळाच विषय) केवळ एका हिट गाण्यावर अनेक पिक्चर्स सुपरड्युपर हिट झालीत. 'हीरो' (१९८३)चे पहिले दोन आठवडे थंडच होते. सो सो रिस्पॉन्स होता. तू मेरा जानू है... एव्हाना ऑडिओ कॅसेटने हिट होत होत गेले आणि मग पिक्चर असा काही हिट की आजही त्याची सगळीच गाणी हिट आहेत. हिट गाणी एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्यात नेत असतातच. चित्रपट तारखेने जुना होत असतो, पण त्यातील लोकप्रिय गाण्यांनी तो कायमच आपलं अस्तित्व दाखवत असतो. ही 'चाल' वेगळीच आणि यशस्वी.

सुपरड्युपर हिट चित्रपटात काही आठवड्यांनी 'आणखी एक गाणे' हाही एक ट्रेण्ड होता. 'तेजाब' बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत असतानाच दिग्दर्शक एन. चंद्रा यांनी अनिल कपूर व माधुरी दीक्षितवर एका गाण्याचे चित्रिकरण करीत ते चित्रपटात समाविष्ट केले. त्या एका गाण्यासाठी अख्खा पिक्चर पाह्यला हवाच. दिग्दर्शक इंद्रकुमारने 'दिल'साठी आमिर खान व माधुरी दीक्षितवर असेच एक गाणे चित्रित करताना आम्हा मीडियाला शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर बोलावले. पिक्चर हिट असताना स्टार अगदी दिलखुलासपणे बोलतो असाच प्रत्यय येतोच. एक गाणे किती तरी गोष्टी घडवत असतो.

'सैराट'चं 'झिंग झिंग झिंगाट' गाणं सुरू किती होतेय नि आपण पडद्यासमोर जाऊन मन नि शरीर मोकळं सोडून नाचतोय असेच जणू अनेकांना झालं होतं. मुंबई, पुण्यापासून कॅलिफोर्नियापर्यंत हा 'झिंगाट' फंडा धमाल नाचला. याची सुरुवात नेमकी कशी झाली की त्यात काही मार्केटिंग फंडा होता हे समजायच्या आतच हे फॅड प्रचंड वेगाने सगळीकडे पसरले. चित्रपटाचा आनंद असा घ्यावा याचाच जणू हा प्रत्यय होता. चित्रपट पाहणे हे आपल्याकडे एकादा लहान मोठा जणू सणच. म्हणून तर 'बाईपण भारी देवा', 'झिम्मा २'च्या गाण्यावरही मल्टिप्लेक्समध्ये ताल धरला गेला.


फार पूर्वीपारपासून थिएटरमध्ये 'गाण्याला वन्स मोअर ' मिळत असता तर पब्लिकचा पैसा व्याजासह वसूल झाला असता. 'गल्ली चित्रपटा'त ते शक्य होई. 'अलबेला'मधील भोली सूरत दिल के खोटे पिक्चर संपल्यावर पुन्हा प्रोजेक्शनवर पुन्हा चढवले जाई. 'सोंगाड्या'च्या मळाच्या माळामध्ये कोण गं उभी या गाण्यालाही गल्ली चित्रपटात वन्स मोअर मिळत असे.

आपले अनेक चित्रपट खास गीत, संगीत व नृत्यासाठी पाहिले गेलेत, पुन्हा पुन्हा पहावेसे वाटतात. मग कधी गाण्याला दाद म्हणून पडद्यावर पैसे उडवले गेले, तर कधी अनेक स्टार्सच्या गाण्यातील नृत्याच्या स्टेप्सवर त्याचे फॅन्स गोपालकालापासून वाढदिवसानिमित्तच्या पार्टीत मस्त नाचतात. हिट गाणे फक्त पडद्यावर राहत नाही. ते पब्लिकमध्ये असं मिसळते.
















## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान

शेतीला आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरण्यासाठी पूरक व्यवसाय करण्याची आवश्यकता आहे. फलोत्पादन हा शेतीला अधिक मूल्यवर्धन ठरणारा व्यवसाय ठरू शकतो. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजना राबविण्यात येतात. या अंतर्गतच फलोत्पादन पिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान २०२३-२४ काढणीत्तोर व्यवस्थापन घटकांतर्गत एकात्मिक पॅक हाऊस, पूर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पांच्या उभारणीसाठी शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होण्यास मदत होणार आहे.

फलोत्पादन पिकांचे मुल्यवर्धन/ प्रक्रिया करून शीतगृहांमध्ये साठवणूक करून फलोत्पादन पिके/त्यांचे पदार्थ वर्षभर सर्व हंगामात उपलब्ध होऊ शकतात ही बाब लक्षात घेऊन एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत काढणीत्तोर व्यवस्थापन घटकांतर्गत एकात्मिक पॅक हाऊस, पूर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पांच्या उभारणीसाठी शासनाकडुन अर्थसहाय्य देण्यात येते. उत्पादित फलोत्पादन, औषधी, सुगंधी मालाची साफसफाई, प्रतवारी व पॅकिंग करून दर्जा कायम ठेवून साठवणूक कालावधी वाढवणे तसेच मोठ्या प्रमाणावर फलोत्पादन पिकांच्या मालाची आवक वाढवून बाजार मुल्य शेतकऱ्यांना कमी मिळते या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याकरिता एकात्मिक पॅक हाऊस, पूर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर व एकात्मिक शीतसाखळी इ. प्रकल्पांना प्रोत्साहन व अर्थसहाय्य दिले जाते.

शेतकरी, शेतकरी उत्पादक गट, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट, नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये कमीत कमी २५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, कंपनी, महापालिका, सहकारी संस्था, सहकारी मार्केटिंग फेडरेशन, लोकल बॉडी, कृषी उत्पन्न बाजार समिती, पणन मंडळ, शासकीय विभाग, ग्रामपंचायत. शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक संस्था, शासन मान्य संस्था, सहकारी संस्था यांना प्राधान्यक्रम देण्यात येईल. वैयक्तिक शेतकरी, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट (ज्यामध्ये किमान १५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, कंपनी, शेतकरी गट यांच्यासाठी अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून कर्जाच्या परताव्याच्या स्वरूपात अनुदान देय राहील.

भागीदारी संस्था असल्यास भागीदारांपैकी एकाही भागीदाराची यापूर्वी अनुदानित इतर काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पूर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पात भागीदारी असल्यास पुन:श्च भागीदार संस्थेस लाभ घेता येणार नाही. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शासकीय संस्था, राज्य सहकारी संस्था, नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये कमीतकमी २५ सदस्य असतील) यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील सलग तीन वर्षाचे अहवाल सादर करणे बंधनकारक राहील तसेच त्यांना प्रकल्प किमतीतील स्वभांडवल उभारू शकतील याबाबतचे पुरावे सादर करावे लागतील.

**-दत्तात्रय कोकरे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

## आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन

आज आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन. लोकांचे अधिकारांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी तसेच जगभरातील नागरिकांच्या मानवाधिकारांप्रती जागरूकता निर्माण करण्यासाठी १९५०पासून १० डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस म्हणून साजरा करण्यात येईल असे संयुक्त राष्ट्रसंघटनेने स्पष्ट केले होते. या दिवसासाठी १० डिसेंबर हीच तारीख निवडण्यामागचे कारण म्हणजे १९४८ साली याच दिवशी जगभरातल्या नागरिकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने एक घोषणापत्र जाहीर केले. हे घोषणापत्र ५००पेक्षा जास्त भाषांत अनुवादित आहे.




मानवी हक्कांचे महत्व आदर्शपणे ५३९ ईसा पूर्वमध्ये समजले. जेव्हा सायरस द ग्रेटच्या सैन्याने बॅबिलोन जिंकला. सायरसने गुलामांना मुक्त केले, सर्व लोकांना त्यांचा स्वतः चा धर्म निवडण्याचा अधिकार असल्याचे घोषित केले आणि वांशिक समानता प्रस्थापित केली. ही तत्त्वे सायरस सिलेंडर म्हणून ओळखल्या जाणार्या बेक्ड-क्ले सिलिंडरवर रेकॉर्ड केली गेली, ज्यांच्या तरतुदी मानवी हक्कांच्या सार्वभौमिक घोषणेच्या पहिल्या चार कलमांसाठी प्रेरणा म्हणून काम करतात. १२१५मध्ये मॅग्ना चार्टच्या प्रमोल्गेशनद्वारे ज्याने कायद्याचे राज्यची कच्ची संकल्पना आणि सर्व व्यक्तींना परिभाषित अधिकार आणि स्वातंत्र्यांची मूलभूत कल्पना सादर केली, जी अनियंत्रित खटला आणि तुरुंगवासापासून संरक्षण देते. मॅग्ना चार्टापूर्वी कायद्याचे राज्य, जे आता कोणत्याही आधुनिक लोकशाही समाजात सुशासनाचे मुख्य तत्त्व मानले जाते, एक दैवी न्याय म्हणून समजले जात होते.

आपले राष्ट्रीयत्व, निवासस्थान, लिंग, लैंगिक अभिमुखता आणि लिंग ओळख, राष्ट्रीय किंवा वांशिक मूळ, रंग, धर्म, भाषा किंवा इतर कोणत्याही स्थितीची पर्वा न करता मानवाधिकार हे सर्व मानवांसाठी महत्वाचे आहे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा छळ न करता आपल्या मानवी हक्कांसाठी आपण सर्व समान पात्र आहोत. यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

जगभरात दरवर्षी १० डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा केला जातो. १० डिसेंबर १९४८ रोजी प्रथमच संयुक्त राष्ट्र संघाने मानवाधिकार स्वीकारण्याची घोषणा केली, मात्र याची अधिकृतपणे घोषणा १० डिसेंबर १९५० रोजी करण्यात आली. १९५०मध्ये सर्व देशांना आमंत्रित केल्यानंतर सभेत ठराव पास केला आणि सर्व देशांना आणि संबंधित संस्थांना हा दिवस साजरा करण्याबाबत सूचित केले.

संयुक्त राष्ट्र संघाने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवाधिकारांचा सार्वत्रिक जाहीरनामा जारी करून प्रथमच मानवाच्या हक्कांबद्दल सांगितले. १९५०मध्ये सर्व देशांना आमंत्रित करण्यात येऊन या दिवसाची अधिकृत घोषित करण्यात आली होती. तेव्हापासून दरवर्षी १० डिसेंबर रोजी हा दिवस साजरा केला जातो. मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा ५००हून अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहे. त्याचवेळी भारतात २८ सप्टेंबर १९९३पासून मानवी हक्क कायदा लागू झाला आणि १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना झाली.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्षेत्रातही काम करतो. या अंतर्गत नागरिकांना वेतन, आरोग्य, बालविवाह, महिलांचे हक्क याबाबत जागरूक केले जाते. (साभार : इंटरनेट)

## निवडक

### फिरत्या वाचनालयात रमले विद्यार्थी



**माणगाव** : टीडब्ल्यूजे माणगाव यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या भावार्थ चालत्या फिरत्या वाचनालय व्हॅनची गुरुवारी (दि. ७) राजिप शाळा विकास कॉलनी शाळेत कवी, लेखक भा. रा. तांबे यांच्या पुण्यतिथीनिमित्त भेट घेतली. गाव तिथे देवालय त्याचप्रमाणे २१व्या शतकात गाव तिथे वाचनालय या संकल्पनेतून भावार्थ वाचनालय हे राज्यभर फिरणारे फिरते वाचनालय उपक्रम आहे. व्हॅनचे प्रमुख जयेश पवार यांनी पुस्तके का वाचावित, कशी वाचावी, गाडीचे वैशिष्ट्य, पुस्तकांचे विविध प्रकार कोणते याविषयी मार्गदर्शन केले. माणगाव पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या प्रमुख गटशिक्षणाधिकारी सुनीता खरात यांनी चालत्या फिरत्या वाचनालयाचे कौतुक केले. विकास कॉलनी शाळेच्या मुख्याध्यापिका गीतांजली शेळके, शिक्षिका कासे यांनी महाराष्ट्रभर फिरणाऱ्या या वाचनालयाचे स्वागत करून पुन्हा शाळेला भेट देण्याची विनंती केली.

### शेती अभ्यासासाठी शेतकरी रवाना

**धाटाव** : शेतकरी अभ्यास दौऱ्यासाठी ग्रामपंचायत चिंचवलीतर्फे आतोने येथून शेतकरी बारामतीला रवाना झाले आहेत. दोन दिवस तेथे वास्तव्य करून शेती संबंधित अत्याधुनिक माहिती हे शेतकरी बांधव संकलित करणार आहेत. शेतकरी बांधवांस अत्याधुनिक पद्धतीने शेतीचे ज्ञान मिळावे यासाठी सरपंच संजय मोते यांच्या प्रयत्नांतुन बारामती कृषि केंद्र येथे या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दौऱ्यामध्ये सरपंच संजय मोते, नाना शिंदे, मंगेश अमरूसकर, लक्ष्मण मुसले, नारायण भोईते, यशवंत बारासकर, नारायण शिंदे, भास्कर चोरघे, महुकर कदम, अनंत पडवल, गंगाराम काटकर उदय शिंदे, हनुमान देशमुख, मधुकर पवार, संदीप पवार अनिल शेडग, नितेश जाधव आदी शेतकरी सहभागी झाले आहेत.



# गावरान भाज्यांची आवक घटली

## अवकाळी पाऊस व वातावरणातील बदलांचा परिणाम

**पाली : प्रतिनिधी**

पावसाळा संपल्यावर जिल्ह्यात अनेक शेतकरी तसेच आदिवासी बांधव आपल्या शेतात, परसात, डोंगरउतारावर व माळरानावर विविध स्थानिक गावरान भाज्यांची लागवड करतात, मात्र यंदा अवकाळी पाऊस, वातावरणातील बदल अशा कारणांमुळे या गावठी भाज्यांचे उत्पादन घटले आहे. त्यामुळे गावठी किंवा गावरान भाज्या कमी प्रमाणात बाजारात येत आहेत.





या हंगामातील या सकस, रुचकर आणि आरोग्यवर्धक भाज्यांना चांगली मागणी असते. दिवाळीपर्यंत बाजारात शिराळे, घोसाळे, कारली, माठ, पडवळ, वांगी, भेंडी, काकडी, दूधी, आळुची पाने, गवार, वड्यांची पाने, ठाकरी मिरच्या अशा गावठी भाज्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात, मात्र मागील दोन आठवड्यांपासून तुलनेत या भाज्यांचे प्रमाण व आवक कमी झाली आहे. त्यामुळे या भाज्यांच्या किंमतीदेखील वधारल्या आहेत.

सतत बदलणारे हवामान व अवकाळी पाऊस हे येथील शेतकरी व आदिवासींसाठी धोक्याची घंटा आहे. ही परिस्थिती अशीच राहिल्यास शेतकरी व आदिवासींचा हक्काचा रोजगार हिरावण्याची भीती आहे, असे सुधागड तालुक्यातील शेतकरी शरद गोळे यांनी सांगितले.

**स्थानिक गावठी भाज्या आवर्जून खातो. त्या खाण्यास चविष्ट, रुचकर व तुलनेने स्वस्त असतात, मात्र सध्या या भाज्या बाजारात मिळत नाही आहेत.**

**–लता माळी**, गृहिणी, पाली

**अवकाळी पावसामुळे अनेकांच्या भाजीपाल्याचे नुकसान झाले आहे. शिवाय उत्पादनातदेखील घट होत आहे. वातावरणातील बदलामुळे चांगला दर्जेदार भाजीपाला तयार होत नाही. म्हणून भाव मिळत नाही. या सर्व गोष्टींमुळे शेतकऱ्यांचे व आदिवासी बंधू–भगिनींचे मोठे नुकसान होते.**

**–अभिजित देशमुख**, प्रयोगशील शेतकरी, महागाव

### नाईलाजाने मंडईतील भाज्यांची विक्री

**गावठी किंवा गावरान भाज्यांचे नुकसान झाल्याने प्रामुख्याने आदिवासी महिलांचा रोजगार बुडाला आहे. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी नाईलाजाने त्या पुणे, मुंबईतील मंडईतून आलेल्या भाज्या स्थानिक विक्रेत्यांकडून घेऊन विकत आहेत, मात्र यामध्ये त्यांना कमी फायदा मिळतो. शिवाय ग्राहकांना गावठी भाज्या न मिळाल्याने त्यांचादेखील हिरमोड होतो**

### कंदमुळेसुद्धा कमी

**दिवाळीपर्यंत कंदमुळेदेखील मुबलक प्रमाणात मिळत होती, मात्र मोठ्या प्रमाणात झालेल्या अवकाळी पावसामुळे कंदमुळे भिजून खराब झाली आहेत. काहींना मोड आले आहेत. त्यामुळे बाजारात कंदमुळेसुद्धा फारशी विक्रीसाठी येत नाही आहेत.**

## कर्जतमध्ये मंत्री छगन भुजबळ यांना शिवीगाळ करणाऱ्या तरुणावर कारवाईची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथे ओबीसी नेते छगन भुजबळ हे त्यांच्या अधिवेशनासाठी येत असताना त्यांना एका तरुणाने अर्वाच्य भाषेत शिविगाळ केली होती. त्या तरुणाचा ओबीसी समाज संघटनांनी निषेध केला असून संबंधित तरुणावर पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन ओबीसी समाज संघटनेने कर्जत पोलिसांना दिले आहे.

तालुक्यात ३० नोव्हेंबर रोजी ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ हे पक्षाच्या अधिवेशनासाठी आले होते. त्या वेळी दहिवलीतील मनोज लाड या तरुणाने मंत्री छगन भुजबळ यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्यामुळे सर्व ओबीसी समाज बांधवांनी नेरळ येथे बैठक घेऊन मंत्री छगन भुजबळ यांना शिवीगाळ करणाऱ्या तरुणाचा निषेध करून संबंधित तरुणावर पोलिसी कारवाई व्हावी, अशी मागणी केली होती. त्यासाठी कर्जत पोलीस ठाण्यात निवेदन देण्याचे ठरले होते आणि त्यानिमित्ताने ओबीसी समाज संघटना संघर्ष समिती यांनी कर्जत पोलीस ठाणे येथे जमून पोलिसांना निवेदन दिले.

त्या वेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष सुरेश टोकरे, भटक्या विमुक्त जाती राष्ट्रीय उपाध्यक्ष भगवान चव्हाण, सोनार समाजाचे पोतदार यांच्यासह इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे तसेच नरेश जोशी, सुरेश गोमारे, अरुण कराळे, दशरथ मुने यांच्यासह अनेक समाज संघटना यांचे प्रतिनिधी हजर होते.

## अंमली पदार्थप्रकरणी तिघांना पोलीस कोठडी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील ढेकू हद्दीत अंमली पदार्थ तयार करणाऱ्या कारखान्यावर रायगड पोलिसांनी धाड टाकून अटक केलेल्या कमल जयरामदास जैसवानी (वय ४८, रा. कल्याण मुरबाड रोड कल्याण पश्चिम), मतीन बाबू शेख (वय ४५, रा. छत्रपती संभाजीनगर) व अँथोनी पाऊलोस करूकुटीकरण (वय ५४ रा. वागळे स्टेट, ठाणे) यांना शुक्रवारी (दि. ८) न्यायालयात हजर केले असता, १४ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

ड्रगमाफिया ललित पाटील प्रकरणानंतर रायगड पोलिसांनी तपासणी मोहीम राबवली होती. त्यात ढेकु गावचे हद्दीत इंडीया इलेक्ट्रीक पोल्स मॅन्युफॅक्चरिंग कारखान्यात संशयास्पद हालचाली वाटल्याने कारखान्यावर रायगड आणि खोपोली पोलिसांनी धाड टाकली. सुमारे १०७ कोटी ३० लाख ३२ हजार ३७७ रुपये किंमतीचे मेफेड्रॉन (एमडी) पावडर आणि मुद्देमाल जप्त केला होता.

इलेक्ट्रीक पोल कारखाना बंद झाल्यानंतर त्या ठिकाणी जैसवानी, मतीन शेख, अँथोनी यांनी मेफेड्रॉन उत्पादन सुरू केले. बाहेरून कारखान बंद आणि आत उत्पादन सुरू होते.

कारखान्यात परप्रांतीय चार ते पाच कामगार काम करीत असल्याची माहिती मिळाली असून पोलीस चौकशी करीत आहेत. मोठे ड्रग रॅकेट यामागे कार्यरत असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली असून आणखी आरोपींना अटक होणार असल्याचेही सांगण्यात येत आहे.

## शेतकरी विकास प्रतिष्ठानचा कृषी सोहळा उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**




शेतकऱ्यांसाठी भरभरून कृषी योजना आहेत. त्या सर्व योजनांचा शेतकरी बांधवांनी परिपूर्ण लाभ घेतला पाहिजे. रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठानने सर्वच शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक म्हणून काम करीत कृषी चळवळ उभी केली. संबंध तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. उपस्थितांत तरुण शेतकरी पाहिल्याने कृषी चळवळ अधिक प्रगल्भ होईल, असे प्रतिपादन उपविभागीय कृषी अधिकारी आनंद कांबळे यांनी केले. शेतकरी विकास प्रतिष्ठान आयोजित कृषी मेळाव्यात ते बोलत होते.

येथील भाटे सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात कृषीसंबंधी विविध कार्यक्रमाला व्यासपीठावर स्मार्टचे उपसंचालक सतीश बोराडे, कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ. मनोज तलाठी, यंग युनिटीचे अध्यक्ष डॉ. फरीद चिमावकर, सिटीझन फोरमचे अध्यक्ष आप्पा देशमुख, कृषी अधिकारी महादेव करे, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, शेतकरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत, कृषी पुरकचे राहुल जोशी, मजूर फेडरेशनचे चेअरमन हेमंत ठाकूर, दीपक फाउंडेशनचे अजय आव्हाडे, बळीराजा फाउंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, कृषी अधिकारी अशोक दांडेकर, गडकिल्ले अभ्यासक सुखद राणे, कळसगिरी प्रकल्पाचे सुरेंद्र निंबाळकर, शेती उद्योजक नितीन पिंपळे, अधिकारी उपस्थित होते.

या वेळी कृषी क्षेत्रात कौतुकास्पद कामगिरी केलेल्या चंद्रकला खेरटकर, सुशांत मोरे, ऋषिकेश म्हात्रे, अदिती थिटे, केशव खरीवले, अमित गायकवाड, नितीन पिंपळे, सुरज दहिंबेकर, विजय लोरणकर, किरण महाबळे, रवींद्र राऊत, महादेव सकपाळ, राकेश लोखंडे, राहुल जोशी, भरत पाटील, पांडुरंग भेरे, राजेंद्र जाधव, ज्ञानेश्वर थिटे, रघुनाथ कडू, जितेंद्र जोशी आदी शेतकऱ्यांना गौरविण्यात आले.

कृषी दिनदर्शिका २०२४चे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. सूत्रसंचालन नारायण पानसरे, आभार प्रदर्शन संतोष देवकर यांनी केले.

## माणगाव तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील मान्यवरांना सन २०२३ या सहाव्या वर्षातील पुरस्काराचे वितरण व विशेष व्यक्तींचा सत्कार समारंभ कार्यक्रमाबाबत संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांनी शनिवारी (दि. ९) बैठकीत माहिती दिली. या बैठकीला पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार मजिद हाजीते, ज्येष्ठ मार्गदर्शक विजय मेथा, सल्लागार आजेश नाडकर, उपाध्यक्ष प्रभाकर मसुरे, उपाध्यक्ष निलेश म्हात्रे, सचिव सचिन देसाई, सहसचिव स्वप्ना साळुंके, प्रवक्ता संतोष गायकवाड आदी पत्रकार उपस्थित होते.

महाडचे दै. रायगडचा आवाजचे संपादक दिलदार पुरकर, मुख्याधिकारी संतोष माळी, अजित शेख, डॉ. अभिजित मेहता, ॲड. देवदत्त ठाकूर, झी २४ तास वाहिनीचे रायगड जिल्हा प्रतिनिधी प्रफुल्ल पवार, बाळाराम दबडे, प्रा. सतीश बडगुजर, उद्योजक मनीष मेथा,



ग्रामसेविका नम्रता तरडे, तलाठी चंद्रकांत बंदपट्टे, पांडुरंग मारणे, पोलीस रामनाथ डोईफोडे, शिक्षक जयसिंग बेटकर, कृषी अधिकारी प्रमोद देशमुख, सणसवाडीच्या सरपंच सुनीता नलावडे, ग्रामविकास अधिकारी नरेंद्र घाडगे, उद्योजक नागेश शिरगावकर, गणेश पवार, निलेश सत्वे, शेतकरी सुनील जांभरे, वाहतूक पोलीस शिवराज बांडे, कृष्णा गांधी, ज्योती बुटाला, प्रिया तेटगुरे–घरत, हरेश शेट, मीनल मेथा, नथुराम पोवार आदींना आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

## फणसाड अभयारण्यात जाळ रेषा काढण्याच्या कामास वेग

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील सुपेगाव परिसरात ५४ चौरस किमी क्षेत्रात फणसाड अभयारण्याचा विस्तार आहे. अत्यंत घनदाट जंगल व उंच अशी निलगिरीची झाडे यामुळे येथे नेहमी थंड वातावरण असते. फणसाड अभयारण्याच्या हद्दीत तीन तालुक्याचा स्पर्श होतो. मुंबईकडे जाताना अलिबाग, मुरूड व रोहा तालुका यांच्या सीमा येत आहेत. फणसाडचे मुख्य क्षेत्र हे मुख्य रस्त्यालगत असल्याने दुचाकीस्वार व मोठी वाहने येथून ये–जा करीत असतात. पावसाळा संपल्यानंतर साधारणतः नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात फणसाड प्रशासनाकडून जाळ रेषा काढण्याच्या कामाला



सुरुवात केली जाते.

आगीपासून फणसाडचे संरक्षण होण्यासाठी रस्त्यालगत असणारे गवत सुकलेली झुडुपे जाळरेषा काढत असताना जाळून टाकण्यात येते. जसजसे ऊन वाढते तसतसे रस्त्यालगत असणारा सुके गवत व झुडुपे पार सुकून जातात. अशावेळी एखादा दुचाकीस्वार सिगारेट ओढत असताना जळती सिगारेटची तुकडा या सुक्या गवतावर पडल्यामुळे संपूर्ण जंगल परिसराला मोठी आग लागण्याची शक्यता असते. असे प्रसंग टाळता यावे यासाठी वनविभाग दरवर्षी जाळरेषा काढण्याचे काम करीत असते.

नवाबाच्या राजवाडा परिसर तसेच विहूर हद्दीत जाळरेषा काढण्याच्या कामाला शनिवारी सुरुवात करण्यात आली. या वेळी येथील सुके गवत तसेच झाडेझुडुपे, लहान बोराची झाडे, तसेच सुकलेली झाडे जाळून अभयारण्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न सर्व वन कर्मचाऱ्यांनी केला.

ठाणे वन्यजीव अभयारण्यचे उपवनसंरक्षक अक्षय गजभीये यांचे मार्गदर्शनाखाली फणसाड वन्यजीव अभयारण्यात आगीपासून वनाचे संरक्षण करण्यासाठी जाळरेषा घेण्यात येतात.

सध्या वणव्याचा हंगाम असल्याने मुरूड ते विहुर मुख्य रस्त्यालगत जाळरेषा घेण्यात आली. या वेळी फणसाड अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर, नांदगाव वनपाल आदेश पोकळ, वनरक्षक अरुण पाटील, प्रदीप शेळके, सदा नाईक, दिपक पतेने, किशोर धनावडे, रुपेश पाटील, दिपक वाघमारे व अन्य कर्मचारी उपस्थित होते.

## फोन आला अन् चोरांनी धूम ठोकली!

### कर्जतमध्ये सीसीटीव्हीमुळे चोरीचा डाव फसला

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील दहिवली विभागातील सुयोग नगरमध्ये राहणारे रहिवाशी लंडनला आपल्या मुलाकडे गेले होते. इकडे रात्री चोर त्यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसले. त्यांनी त्यांच्या नातेवाईक व मित्रांना फोन करून हा प्रकार निदर्शनास आणून दिला आणि घरी असलेल्या लँडलाईनवर फोन केला. फोनची रिंग वाजताच चोरांनी चोरी करण्याचे सोडून तेथून काढता पाय घेतला.



सुयोग नगरमध्ये राहणारे दत्ता महादेवराव मोरे हे लंडनला आपल्या मुलाकडे गेले होते. तेथे रात्री ९ वा. च्या सुमारास त्यांनी सीसीटीव्हीला कनेक्ट असलेला मोबाईल सुरू केला. त्या वेळी भारतात रात्रीचे २.१५ वाजले होते. त्यांना आपल्या घराच्या दाराचे कुलूप तोडण्याचा प्रयत्न करीत असलेल्या दोन व्यक्ती दिसल्या. त्यांनी लगेचच त्यांचे जावई सुशील बेलोसे व मित्र वसंत मोधळे यांना फोन करून घटनेची कल्पना दिली. मोधळे लगेचच सुयोग नगरकडे जाण्यास निघाले. इकडे मोरे चोरांच्या हालचाली मोबाईलवर पहात होते. त्यांनी घरी असलेल्या लँडलाईनवर फोनच्या दोन–तीन रिंग देऊन ते थांबले. कुलूप तोडत असलेल्या चोरट्यांना घरात कुणीतरी फोन उचलला, असे वाटल्याने त्यांनी तेथून काढता पाय घेतला.

यानंतर १० मिनिटांनी बेलोसे आणि ठाणगे घटनास्थळी पोहचले. विशेष म्हणजे मोरे यांच्या घरी एव्हढ्या रात्री काहीतरी गडबड आहे हे शेजारी असलेल्या अरुण दास्ताने कुटुंबियांच्या निदर्शनास आले. त्यांनी लगेचच पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. या घटनेची तक्रार सुशील बेलोसे कर्जत ठाण्यात गेले असता केवळ तक्रार नोंदवून घेतली, मात्र चोरीच झाली नसल्याने पंचनामा करण्यास नकार दिला. सुयोग नगरमध्ये गेल्या दोन वर्षात अनेक चोऱ्या झाल्या मात्र त्यातील एकही चोरी उघडकीस आली नाही. या चोरीचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना दिले असून त्यामध्ये एक चोर स्पष्टपणे दिसत आहे. आता पोलीस काय तपास करतात याकडे नागरिकांचे लक्ष आहे.

## कोकणातील भाविकांची आळंदीत मांदियाळी

**चौक** : कार्तिकी एकादशीनिमित्त शनिवारी (दि. ९) आळंदी येथे वारकरी संप्रदाय व भाविकांनी गर्दी केली होती. अनेकांनी कळसाचे दर्शन घेऊन परतीची वाट धरली. यामध्ये कोकणातील भाविकांचाही समावेश होता.

आळंदी येथे वारकऱ्यांबरोबर पायी वारी दिंडी व भाविकांचे आगमन झाले. त्यांनी मुख दर्शन घेतले, तर अनेकांनी कळसाचे दर्शन घेऊन परतीची वाट धरली. काही ठिकाणी मार्ग बंद केल्याने गर्दी झाली होती. पोलिसांनी एकेरी मार्ग काढून भाविकांना मार्गस्थ केले.

### शुद्धीपत्रक

मंगळवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी 'रामप्रहर' या दैनिक वृत्तपत्रामध्ये पान क्र. ५ वर छापण्यात आलेल्या जाहीर नोटीस मधील मौजे – वांगणी तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे नं. चे वाचन ११९/क ऐवजी १०९/क असे करावे.

# निवडक




## रसायनीत महापरिनिर्वाण दिन

**मोहोपाडा :** रसायनीतील सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारी सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांच्या पुढाकाराने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. संस्थेच्या कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड, सुनील निकाडे, दाजिबा तायडे, प्रवीण गायकवाड, पत्रकार गौतम सोनावणे, श्री. पाटील, वृषाली कांबळे, मोनाली जंगम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील निकाडे यांनी केले.

## पोलिसाने वाचवले कर्मचाऱ्याचे प्राण

**पनवेल :** हॉटेल कर्मचाऱ्याला हृदयविकाराचा झटका आल्याचे लक्षात येताच पोलीस अंमलदाराने त्याच्या हृदयाला पम्पिंग करून प्राण वाचवले. खारघर येथील हॉटेलमध्ये हा प्रसंग घडला. यामुळे नवी मुंबई पोलिसांच्या मोटर वाहन विभागातील पोलीस अंमलदारावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. नवी मुंबई पोलीस दलात मोटर वाहन विभागातील पोलीस अंमलदार एकनाथ पाटील हे हॉटेलमध्ये सहकुटुंब जेवण करण्यासाठी गेले होते. त्या वेळी एक कर्मचारी अचानक जमिनीवर कोसळल्याचे त्यांना दिसले. त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याचे पाटील यांच्या लक्षात आले. त्यांनी प्रशिक्षण घेतले असल्याने व्यक्तीच्या हृदयावर जोर देऊन पम्पिंग करण्यास सुरुवात केली. त्यांच्या प्रयत्नाने श्वास मोकळा होऊन त्या कर्मचाऱ्याचे प्राण वाचले.

## गुढघा रिप्लेसमेंट सर्जरी यशस्वी

**नवी मुंबई :** वाशी येथील ऑर्थोपेडिक सर्जरीचे संचालक डॉ. प्रमोद भोर आणि त्यांच्या टीमने १७ महिन्यांमध्ये २८७ यशस्वी रोबोटिक क्नी रिप्लेसमेंट सर्जरी करण्याचा उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. मुंबई महानगर क्षेत्रात पहिल्यांदाच ही उपलब्धी संपादित करण्यात आली आहे, ज्यामधून वैद्यकीय केअरमधील प्रगत रोबोटिक सर्जरी प्रकाशझोतात आली आहे. मार्च २०२२मध्ये सुरू झाल्यापासून फोर्टिस हिरानंदानी हॉस्पिटल वाशी येथील रोबोटिक नी रिप्लेसमेंट प्रोग्रामला भव्य यश मिळाले आहे. यामुळे गुडघेदुखी व सांधेदुखीच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या रूग्णांचे जीवन सुधारले आहे.

### नवी मुंबईत पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

# ८९,१९७ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात रविवारी (दि. १०) उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये ० ते ५ वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ लसीकरण करण्यात येणार असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने पोलिओ लसीकरणाचे सुयोग्य नियोजन केले आहे.


(संग्रहित छायाचित्र)

भारत देश पोलिओमुक्त आहे, परंतु काही देशांमध्ये अद्याप पोलिओ असल्याने तो पुन्हा परत येऊ शकतो. यासाठी पल्स पोलिओ मोहीम राबविली जात आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ० ते ५ वर्ष वयोगटामधल्या अपेक्षित ८९,१९७ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य ठेऊन मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. त्याकरिता २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात ६०५ स्थायी, ९३ ट्रांझिट व २७ फिरते मोबाईल असे एकूण ७२५ बुथ कार्यरत असणार आहेत. या लसीकरण मोहिमेसाठी मॉल, रेल्वेस्टेशन, बसस्टँड अशा वर्दळीच्या ठिकाणी ट्रांझिट व फिरती मोबाईल पथके तयार करण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे महापालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या अध्यक्षेतखाली सिटी टास्क फोर्स समितीची बैठक घेण्यात आली असून नियोजनाचा आढावा घेण्यात आला, तसेच पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबविण्याकरिता वैद्यकीय अधिकारी, एनएम, एलएचव्ही, एएनएम, आशा व स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

या मोहिमेकरीता महापालिका कार्यक्षेत्रात जनजागृतीपर पोस्टर्स व बॅनर्स लावण्यात आले आहेत. पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या दिवशी बूथवरील स्वयंसेवकांनी बाळाला हाताचा स्पर्श होणार नाही याची काळजी घेणे, तसेच डाव्या करंगळीवर पेनने खूण करताना बाळाचा हात न पकडणे याबाबात प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. या पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत ज्या बालकांनी रविवारी डोस घेतला नसेल त्यांना महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने ८८८ टिमद्वारे गृहभेटीमध्ये पुढील पाच दिवस घरोघरी जाऊन डोस देण्यात येणार आहे. याकरिता प्रत्येक टिमचे कार्यक्षेत्रनिहाय सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

पालकांनी पोलिओवर मात करण्यासाठी देशव्यापी मोहिमेत सहभागी व्हावे आणि आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पल्स पोलिओ लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## ‘नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये’

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रातून आठ अल्पवयीन मुले बेपत्ता झाल्याच्या बातम्या आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या संवेदनशील विषयासंदर्भात वास्तविकता जाणून घेण्यासाठी माजी खासदार डॉ. संजीव नाईक आणि नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी पोलीस आयुक्त मिलिंद भारांबे यांची तातडीने भेट घेतली. डॉ. संजीव नाईक यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

एकाच दिवशी आठ मुलांच्या अपहरणामुळे नवी मुंबईतील पालक शिक्षक आणि शाळांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याच संदर्भात झालेल्या चर्चेवेळी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी त्या आठ मुलांचा शोध लागला असून त्यापैकी सात जण पुन्हा घरी परतले आहेत, तर एक मुलगा त्याच्या मूळ गावी असून तोही लवकर घरी परतणार आहे, अशी माहिती दिली. यापैकी कोणत्याच मुलांचे अपहरण झाले नसून विविध कारणांनी ही मुले घराबाहेर पडली होती.



या प्रकरणी माजी खासदार डॉ. संजीव नाईक आणि जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी घाबरून न जाण्याचे आवाहन पालक, शिक्षक आणि शाळांना केले आहे. एकाच दिवशी आठ मुले बेपत्ता होण्याच्या बातमीमुळे घबराट निर्माण होणे स्वाभाविक आहे, परंतु या मुलांचे अपहरण झाले नसल्याचे पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांनी सतर्क रहावे. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करून याप्रकरणी पोलिसांनी तत्परतेने तपास करून वस्तूस्थिती समोर आणली आहे.

## माझी वसुंधरा अभियानासाठी नवी मुंबई महापालिका सज्ज

### आयुक्तांनी घेतला तयारीचा आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

माझी वसुंधरा अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका राज्यातील क वर्ग महानगरपालिकांमध्ये प्रथम क्रमांकाचे पर्यावरणशील शहर म्हणून मानांकित असून यावर्षीही अधिक उत्तम कामगिरी करण्याचे ध्येय नजरेसमोर ठेवून नवी मुंबई महापालिका सज्ज झाली आहे.



या अनुषंगाने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी आढावा बैठक घेत पंचतत्वांमधील प्रत्येक तत्त्वावर आधारित अपेक्षित कामांचा आढावा घेतला व कार्यवाहीत प्रभावीपणा व गतीमानता आणण्याचे निर्देश दिले. अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ आणि संबंधित विभागप्रमुख, अधिकारी उपस्थित होते.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत नागरिकांपर्यंत अभियानाची माहिती पोहचणे गरजेचे असून नागरिकांनी माझी वसुंधरा अभियानाची ई-शपथ https://majhivasundhara.in/en/lets-pledge वर घेऊन अभियानात उत्साहाने सहभागी होणे अपेक्षित आहे. या दृष्टीने नागरिकांपर्यत ही ई-शपथेची लिंक पोहचवून त्यांनी शपथ घेऊन शपथ घेतल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेबाबत नागरिकांना प्रोत्साहित करावे असेही आयुक्तांनी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना निर्देश दिले.

## स्वागत अन् आभार!



**उरण : आमदार महेश बालदी यांनी केलेल्या मागणीमुळे व त्यानंतर सातत्याने पाठपुराव्यातून अर्थसंकल्पात पळस्पे-कुडावे नदीवरील पुलाच्या कामासाठी अडीच कोटी रुपये, तर कुडावे ते वडवली रस्त्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्याबद्दल नांदगाव, कुडावे व वडवली ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी आमदार महेश बालदी यांचे गावामध्ये जोरदार स्वागत केले व आभार मानले.**

## गव्हाण विद्यालयात व्यवसाय मार्गदर्शन शिबिर

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

दहावी परीक्षेनंतर काय, असा उपस्थित होणारा प्रश्न, विद्यार्थी व पालकांची शैक्षणिक क्षेत्र निवडीतील संभ्रमावस्था टाळावी यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये व्यवसाय मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.



प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिरात खारघर येथील सरस्वती इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. समाधान लांडगे व प्रदीप मुकादम यांनी विद्यार्थ्यांना इ. दहावीनंतर कोणते व्यावसायिक क्षेत्र निवडावे याविषयीचे मार्गदर्शन केले. मेकॅनिकल इन्स्ट्रक्टर अक्षय यमगर हेदेखील या वेळी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेच्या अनिवासी गुरुकुल प्रकल्पांतर्गत झालेल्या या व्यवसाय मार्गदर्शन शिबिरात विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी प्रास्ताविक भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शिबिरास शुभेच्छा दिल्या. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य तथा लाईफ मेंबर रवींद्र भोईर, गुरुकुलप्रमुख संदीप भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## उरणच्या बाजारात वालाच्या शेंगांना मागणी

## खवय्यांना थंडीत पोपटीची चाहूल

**उरण : रामप्रहर वृत्त**

बाजारात सध्या वालाच्या शेंगा येऊ लागल्या असून खवय्यांना पोपटीची चाहूल लागली आहे. त्यामुळे या वर्षीच्या हंगामातील वालाच्या शेंगांच्या पोपट्या सुरू होणार आहेत. काही ठिकाणी पोपट्या लागू लागल्या आहेत.

या वर्षी डिसेंबरच्या सुरुवातीलाच बाजारात वालाच्या शेंगा आल्या आहेत. त्याची खरेदीही सुरू झाली आहे. या शेंगांना किलोमागे १०० रुपये दर आकारला जात आहे. वालाच्या पोपट्या या उरण तालुक्यातील चिरनेर तसेच इतर अनेक भागातून लावल्या जातात.

वालाच्या शेंगांच्या पोपटीची लज्जत आणि चव ही सात समुद्रापलिकडे पोहचली आहे. गवत आणि लाकडाच्या आगीवर वाफेवर शिजविलेल्या शेंगा तयार केल्या जातात. सुरुवातीला केवळ वालाच्या शेंगांच्या ऐवजी सध्या विविध प्रकारच्या शेंगा, वांगी, बटाटा, तसेच अंडी, चिकन ही या पोपटीत शिजविले जाते. तेलाशिवाय वाफेवर शिजणाऱ्या जिन्नस चवीला उत्कृष्ट असतात. त्यामुळे पोपटी ही अनेक ठिकाणी प्रसिद्ध आहे.

असे असले तरी ठराविक ठिकाणच्या पोपटीला खवय्यांकडून पसंती दिली जाते. त्यात उरण तालुक्यातील चिरनेर परिसराचा समावेश आहे.

या पोपटीची खरी जिन्नस म्हणजे शेतात व बांधावर मिळणार म्हामोट्याचा पाळा ही आहे. या पाल्याचा जखमेवर लावण्यासाठीही उपयोग केला जातो.

### चविष्ट, रूचकर शेंगा

सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगा या शेतांच्या बंधावर पाणी आणि रसायनांचा वापर करून पिकविल्या जातात तर चवीच्या खऱ्या शेंगा या शेततातील पिके काढल्यानंतर शेत जमिनीला ओलावा असतांना वालाची पेरणी केली जाते. या वालाच्या पिकाला कोणतेही रसायन किंवा पाणी दिले जात नाही तर हे वालाचे पीक नैसर्गिकरित्या येते. त्यामुळे या वालाच्या शेंगांच्या किंमतीही जास्त असतात. या वालाच्या पिकाची पेरणी १५ दिवसांपूर्वी केली असून हे पीक येण्यासाठी ६० ते ७० दिवस लागतात, अशी माहिती चिरनेर येथील कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली आहे.



## मॉडर्न स्कूलतर्फे पुस्तक प्रदर्शन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी या दृष्टीने मॉडर्न स्कूल, वाशी येथे दोन दिवसीय पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.

मोबाईलच्या युगात वाचनाकडे सर्वांचेच दुर्लक्ष होत आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी यासाठी शालेय शिक्षण विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. रयत शिक्षण संस्थेच्या नवी मुंबई वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्येही अशाच प्रकारचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

विद्यालयामध्ये दोन दिवसीय पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले. ८ व ९ डिसेंबर रोजी पार पडलेल्या या प्रदर्शनाला विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

> **विद्यालयात दरवर्षी पुस्तक भरविले जाते. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य उपक्रम असून आम्ही दरवर्षी या प्रदर्शनाला भेट देतो.**
> **-शिला पाटील, वाशी, पालक**

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्य सुमित्र भोसले, ग्रंथपाल अनिता घोडके, मुकेश सोनावणे, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## वीर वाजेकर महाविद्यालयात संविधान व मानवी हक्कांबाबत कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

राज्यशास्त्र व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ८) एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून संविधान व मानवी हक्क या विषयावर कार्यशाळा झाली.

संविधान संकल्पना, स्वरूप व उपयुक्तता या विषयावर द. ग. तटकरे कॉलेज तळाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भगवान लोखंडे यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. संविधान व भारतीय नागरिक याविषयावर बारकाव्याने आपली निरीक्षणे नोंदविली. आजच्या तरुणांना संविधानाचे महत्त्व व अभ्यास असणे अत्यंत गरजेचे आहे, असे पहिल्या सत्रात नमूद केले. प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून लोखंडे यांच्या भाषणावर आपली अभ्यासपूर्ण मांडणी केली. उपप्राचार्य डॉ. विलास महाले यांनी मान्यवरांचे आभार मानले.

दुसऱ्या सत्रात माहिती अधिकार अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते, पनवेल अल्लाउद्दीन शेख यांनी, आजचा विद्यार्थी आणि मानवी हक्क या विषयावर उदाहरणांसह मांडणी केली. सामाजिक कार्य करीत असतांना कायदा, संविधान, समाजाचे मानसशास्त्र व समाजशास्त्र कशा पद्धतीने विकसित केले, पाहिजे यांवर अत्यंत अभ्यासपूर्ण व वास्तव मते मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदिप घोडके यांनी केले, तसेच राज्यघटनेतील सरनाम्याचे वाचनही करण्यात आले. प्रा. राम गोसावी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. चिंतामण धिंदळे यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रमास प्रा. देवेंद्र कांबळे, प्रा. सरोज, प्रा.स्नेहा म्हात्रे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. आर. बी. पाटील, प्रा. योगेश कुलकर्णी, प्रा. चारुशीला भगत, प्रा. गजानन चव्हाण, प्रा. बळीराम पवार, प्रा. श्रीकांत गोतपगार, डॉ. रत्नमाला जावळे यांच्यासह आरती सुरवसे, मंदिरा म्हात्रे, सुशील कदम, विशाल खरात, मितेंद्र ठाकूर, अमित साहू, सत्येंद्र थोरात आदी राष्ट्रीय सेवा योजनेचे गटप्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुजाता पाटील यांनी केले.



# पाली येथे प्रियांक खर्गेंचा निषेध

## स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल केलेल्या विधानाचे पडसाद






**पाली : प्रतिनिधी**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र व कर्नाटक सरकारमधील मंत्री प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत अवमानजनक विधान केले आहे. त्याचा निषेध करण्यासाठी शनिवारी (दि. ९) पाली येथे शहर भाजपतर्फे तीव्र आंदोलन करण्यात आले. या वेळी प्रियांक खर्गे यांच्या प्रतिमेला जोडे मारून व घोषणा देत निषेध करण्यात आला.

आंदोलनावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष आलाप मेहता म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी व समाजकल्याणासाठी ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले अशा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान हा सर्व महापुरुषांचा व या देशाचा अपमान आहे. भारतीय जनता पक्ष व महाराष्ट्रातील जनता हा अपमान कधीही सहन करणार नाही.

या निषेध आंदोलनास भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेश मपारा, सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, पाली शहर सरचिटणीस सुशील शिंदे, नगरसेवक पराग मेहता, नरेश खाडे, प्रणाली शेट, योगिता द्रविड, वासुदेव मराठे, प्रदीप गोळे, राजेंद्र गांधी, प्रदीप तिवारी, वैभव जोशी, गणेश चौधरी, परशुराम निंबाळकर, निलेश पवार, रवी ठोंबरे, अजित खंडागळे, श्री. थोरवे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी प्रियांक खर्गे यांचा जाहीर निषेध केला.

## राजिपच्या पाच कार्यालयांवर आली जागा शोधण्याची वेळ

**माणगाव : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई–गोवा महामार्गालगत माणगाव बाजारपेठेत असणाऱ्या पूर्वीच्या पंचायत समिती कार्यालयात रायगड जिल्हा परिषदेची महत्त्वाची असणारी पाच कार्यालये कामकाज चालवित आहेत. या कार्यालयांची जागा उपजिल्हा रुग्णालयाकडे वर्ग करण्यात आली असून या ठिकाणी लवकरच ट्रॉमा केअर सेंटर उभारले जाणार आहे. त्यामुळे राजिपच्या या कार्यालयांना स्थलांतरित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तसेच राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र देऊन दिले आहेत. त्यामुळे ही कार्यालये आता भाड्याच्या खोलीतून चालवली जाणार आहेत.

माणगाव येथे पंचायत समितीची स्वतंत्र इमारत गेल्या १६ वर्षांपूर्वी प्रशासकीय भवनालगत भव्य स्वरूपात शासनाने बांधली. त्या ठिकाणी जि.प.च्या विविध विभागांचे काम सुरू आहे, मात्र राजिपच्या तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, एकात्मिक बालविकास सेवा योजना, विभाग आणि गटशिक्षण अधिकारी यांच्याकडील गट साधन केंद्र सर्व शिक्षा अभियान कार्यालय, महिला बचत गट हिरकणी कार्यालय या पाच कार्यालयांच्या विभागांना नवीन पंचायत समिती इमारतीत जागा नसल्याने ही कार्यालये जुन्याच इमारतीत सुरू होती. या इमारतीलगत उपजिल्हा रुग्णालय असल्याने या ठिकाणी शासनाने ट्रॉमा केअर सेंटर एक वर्षांपूर्वी मंजूर केले होते. ते उभारले जाणार असल्याने पाच कार्यालयांना पर्यायी व्यवस्था करण्याचे सांगितले आहे.

ट्रॉमा केअर सेंटरमुळे पाच कार्यालये स्थलांतरित करण्यासाठी संबंधित विभागांना शासनाकडून पत्र आल्याने त्यांच्यापुढे दुसरी जागा शोधण्याची वेळ आली आहे. या कार्यालयांना तहसीलदार व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी प्रयत्न करून बसण्याची व्यवस्था करावी, असेही जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे, मात्र ही कार्यालये स्थलांतरित होणार असल्याने नागरिकांना कार्यालये शोधताना कसरत करावी लागेल.

## कर्जत लायन्स क्लब डायमंडच्या कार्याचा प्रांतपालांनी घेतला आढावा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत लायन्स क्लब ऑफ डायमंडला प्रांतपालांनी भेट देऊन क्लबच्या कार्याचा आढावा घेतला. या वेळी त्यांनी मार्गदर्शक सूचना देऊन केलेल्या कामाचे कौतुकही केले.

लायन्स क्लब कर्जत डायमंडची प्रांतपाल भेट सोहळ्याचे आयोजन ब्राह्मण सभागृहात करण्यात आले होते. सभेची सुरुवात दीपप्रज्वलन व इशस्तवनाने झाली. महेश ठोसर यांनी ध्वजवंदन केले. कर्जत क्लबच्या अध्यक्ष मुग्धा ठोसर यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. राजश्री केदार यांनी अहवाल सादर केला. संजीव सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला क्लबचे जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते. सुरुवात बोर्ड ऑफ डायरेक्टर सभेने झाली. क्लबच्या सर्व आर्थिक व्यवहाराचा हिशेब आणि गेल्या सहा महिन्यांत झालेल्या विविध उपक्रमांचा आढावा या सभेमध्ये घेण्यात आला. या वेळी प्रांतपाल व अन्य पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शक सूचना केल्या आणि चांगल्या उपक्रमांची प्रशंसा केली.

एन. आर. परमेश्वरन यांच्या हस्ते नवीन सभासद मोहन पाठक व फिरोज सिकलगर यांचा शपथस्वधी करण्यात आला. त्यानंतर परमेश्वरन यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे प्रांतपाल अमरचंद शर्मा यांनी क्लबच्या सभासदांशी संवाद साधला. अध्यक्ष मुग्धा ठोसर यांनी अध्यक्षीय भाषण केले.

राजश्री केदार यांनी करण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती सांगितली. सूत्रसंचालन वैशाली नेमाडे यांनी केले. या सभेस आशा शर्मा, नयन कावळे, मीना थारवानी, डॉ. शारदा निवाते. अनुप थारवानी, संजय गोडसे, रमाकांत म्हात्रे, डॉ.स्मललद पाटील, संगीता गोडबोले, वैशाली महादाळकर, विजय निवाते, योगेश कापसे, प्रताप गीते आदी उपस्थित होते.



## कोपरी येथे शेतकऱ्यांना बियाणे वाटप; तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

स्मार्ट प्रकल्पांतर्गत सुखकर्ता ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, कोपरी येथे मूल्य साखळी विकास शेती शाळेचे आयोजन करण्यात आले. या शेती शाळेत प्रादेशिक संशोधन केंद्र कर्जत येथील डॉ.म्हसकर यांनी भाजीपाला लागवडीविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच स्मार्ट प्रकल्प अंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या भाजीपाला मिनी किटमधील बियाणे, वाटप करण्यात आले.



या वेळी कार्बेन्डाझिम व स्टिकी ट्रॅपविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी निंबाळकर यांनी शेतकऱ्यांना शेतीसाठीच्या विविध शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन केले. कृषी पर्यवेक्षक महाडिक व भगत यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून सहकार्य केले.

सूत्रसंचालन व नियोजन आत्मा बीटीएमच्या प्रज्ञा पाटील हिने केले. शेती शाळेत शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते भाजीपाला किटचे वाटप करण्यात आले.

## साजगाव यात्रेची यशस्वी सांगता

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका हद्दीत साजगाव–ताकई येथे धाकटी पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या विठ्ठल मंदिर परिसरात कार्तिकी एकादशीपासून प्रसिद्ध बोंबल्या विठोबाची यात्रा भरली होती. शनिवारी एकादशीच्या दिवशी या वर्षीचा यात्रेचा शेवटचा दिवस होता.

सुरुवातीला पावसाचे सावट व कमी गर्दीने निरुत्साही वातावरण होते, परंतु शनिवार व रविवारी सुटीच्या दिवसांपासून दुसऱ्या आठवड्यात यात्रेत मोठी गर्दी झाल्याने उलाढाल झाली.

## रायगडात देशी-विदेशी स्थलांतरित पाहुणे स्थिरावले







**सुधागड : रामप्रहर वृत्त**

थंडीच्या हंगामात हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध देशी–विदेशी स्थलांतरित पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होतात. अवकाळी पावसामुळे या पक्ष्यांची वाताहत झाली होती, परंतु मागील आठवड्यापासून वातावरण अनुकूल झाले आहे. थंडीही चांगली पडू लागली असल्याने हे स्थलांतरीत व स्थानिक पक्षी स्थिरावले आहेत. त्यामुळे पक्षी अभ्यासक, निरीक्षक व पर्यटकही सुखावल्याचे चित्र आहे.

गणेशोत्सवानंतर आलेला पाऊस तसेच ऑक्टोबर हिट व अवकाळी पाऊस असे हवामानातील बदल यामुळे स्थलांतरित पक्षांसाठी पोषक परिस्थिती नव्हती. आता पुन्हा थंडीच्या आगमनास सुरुवात झाली असल्याने स्थलांतरित पक्षी जिल्ह्यात दाखल होत आहेत. गुलाबी थंडीची चाहूल लागल्याने निसर्गरम्य रायगडात परदेशी स्थलांतरित पक्षी आणि काही स्थानिक स्थलांतरित पक्षांची रेलचेल पाहायला मिळत आहे. वाढलेल्या गवंतामधील कीटक व आळ्या खाण्यासाठी आणि साठलेल्या जलाशयामधील पाण्यातील कीटक, कृमी, मृदुकाय जीव–जंतू खाण्यासाठी तसेच समुद्रकिनारे, दलदलीचे भाग यामधील छोटे खेकडे, मृदुकाय प्राणी, मासे, जलकीटक खाऊन पर्यावरणाचे संरक्षण व जैवविविधता समृद्ध करण्यात हे पक्षी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. या पक्षांचे दर्शन जिल्ह्यातील समुद्रकिनारे, दलदलीच्या जागा, जंगले, भातशेते, खाड्या तसेच गवताळ प्रदेशात होत आहे. पक्षी अभ्यासक व निरीक्षकांना तसेच पर्यटकांना ही मोठी पर्वणीच आहे.

रायगड जिल्ह्यात ४००हून अधिक पक्षी प्रजातींची नोंद आहे. स्थलांतरित पक्ष्यांसाठी येथे अनेक प्रकारचे पोषक नैसर्गिक अधिवास आहेत. त्यामुळे चांगल्या संख्येने पक्षी दाखल होतात. समुद्रकिनारे, पाणथळीचे प्रदेश, घनदाट जंगले, माळराने अशा अधिवासांमध्ये विविध प्रकारच्या पक्षी, प्रजाती जिल्ह्यात थंडीच्या मोसमात येतात. पक्षी निरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी ही गुलाबी थंडी पर्वणीच असते, असे माणगाव येथील वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी सांगितले.

उत्तर गोलार्धातील युरोप, रशिया आणि उत्तर अमेरिका यासारख्या देशात थंडीच्या दिवसांत पडणाऱ्या बर्फामुळे जमिनीवरील भूभाग हा बर्फाने आच्छादलेला असतो. त्यामुळे पक्ष्यांना खाद्य मिळणे कठीण होऊन जाते. म्हणून हे पक्षी विविध देशांत स्थलांतर करून आपली उपजीविका भागवतात. आपल्याकडे पडणारी थंडी आणि पुरेशा प्रमाणात मिळणारे खाद्य तसेच योग्य अधिवास या सर्व कारणांमुळे या पक्ष्यांना आपली घरटी बांधून पिल्लांचे संगोपन करणे सोपे जाते. म्हणून बऱ्याच स्थलांतरित पक्षांचा विणीचा काळसुद्धा हाच असतो, असे माणगाव तालुक्यातील विळे–भागाड येथील पक्षी अभ्यासक राम मुंडे यांनी सांगितले.


### परदेशी पक्ष्यांचा बोलबाला


**ब्ल्यू थ्रोट (शंकर) युरोपियन रोलर (तास पक्षी), युरेशियन रायनेक (मानमोडी) सायबेरियन स्टोनचाट (गप्पीदास पक्षी), बंटिंग्स (भारीट पक्षी), पॅलिड हॅरिअर (पांढूरका भोवत्या).**

### स्थानिक पक्ष्यांचेही आगमन

**पॅराडाईज फ्लाय कॅचेर (स्वर्गीय नर्तक), इंडियन रोलर (भारतीय तास पक्षी), श्राईक (खाटीक), युरेशियन हुपू (हुदहुद), क्रेस्टेड बंटीग (युवराज).**









# मुरूडच्या खोकरी गुंबजाचे प्रवेशद्वार खुले; सुविधा पुरविण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडच्या ऐतिहासिक स्थळांपैकी मुरूड–आगरदांडा रस्त्यावर सहा किमी अंतरावर खोकरीचे गुंबज (गोल घुमट) वास्तुशास्त्राचा अजोड नमुना असून सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वीचे हे शिल्प इतिहासप्रेमींचे आकर्षण आहे. जंजिरा किल्ल्याच्या वाटेवरच हे गुंबज आहेत. त्यामुळे वाहनांना ब्रेक लागतो आणि गुंबज पाहण्याचा मोह पर्यटकांना आवरता येत नाही.



पावसाळ्यात रानझाडे, गवत, झाडे–झुडपे वाढल्याने गुंबज परिसराची स्वच्छता होणे अत्यंत गरजेचे असले तरी पुरातत्व विभागाकडे मनुष्यबळ नसल्याची माहिती आहे. ५ डिसेंबरपासून गुंबज परिसर पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे.

या वास्तुंच्या घुमट आणि कमानींतील प्रमाणबद्धता पाहण्यासारखी आहे. पुरातत्त्व खात्याच्या योग्य व्यवस्थापनाअभावी पर्यटकांना घुमटाची कलाकृती यापूर्वी संरक्षक कुंपणाबाहेरूनच पाहून समाधान मानावे लागत होते, मात्र आता कुलूप उघडल्याने ही वास्तु पाहणे शक्य होणार आहे. येथील मुख्य प्रवेशद्वारापाशी लोखंडी दरवाजा बसविण्यात आला असून घुमटाच्या सभोवती लोखंडी तारेचे कुंपण आहे. नियुक्त केलेल्या सुरक्षारक्षकाची कामाची वेळ सकाळी ९ ते ६ अशी ठेवण्यात आली आहे.

जंजिऱ्याची पार्श्वभूमी माहीत असलेला प्रशिक्षित मार्गदर्शक इथे नेमल्यास इतिहासप्रेमींना वस्तुनिष्ठ माहिती मिळू शकेल तसेच खोकरी हे ठिकाण दर्शविण्यासाठी दिशादर्शक फलक लावण्याची आवश्यकता आहे. या भागाची साफसफाई करणे आवश्यक आहे. दोन घुमटांनाही काळा रंग पकडला असून या पुरातन ऐतिहासिक वास्तूची निगा पुरातन विभागाकडून केली जात नाही. वास्तु आहे त्याच स्थितीत ठेवण्यात आली आहे. पर्यटकांसाठी कोणतीही सुविधा निर्माण करण्यात आलेली नाही. फक्त या वस्तूला तारेचे कंपाउंड वॉल टाकून ही जागा संरक्षित करण्यात आली आहे.

वास्तू संपूर्ण दगडांनी बांधलेली असून दगडे काळी पडलेली आहे, ती घासणे व पॉलिश करणे आवश्यक आहे, मात्र या बाबींकडे पुरातत्त्व खाते दुर्लक्ष करीत आहे. या वास्तूचे सुशोभीकरण व पर्यटकांना आवश्यक असणाऱ्या सेवा निर्माण करण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिक लोकांकडून करण्यात येत आहे.

गुंबज भारतीय व अरबी पद्धतीच्या शिल्पकलेचा एक उत्तम प्राचीन नमुना आहे. सिद्दी सिरुलखान, सिद्दी खैरियतखान व सिद्दी याकुतखान यांच्या या कबरी आहेत. दगडाचे बांधकाम असलेले इंडो–सारसेनिक पद्धतीत बांधलेले हे गुंबज आहेत. त्यापैकी सर्वांत मोठे गुंबज हे सिद्दी सिरूलखानचे असून सिद्दी सिरुलखान जंजिऱ्याचा १७०७ ते १७३३ प्रशासक असल्याची ऐतिहासिक नोंद आहे. सिद्दी याकुतखान हा १६७० ते १६७७ व १६९६ते १७०७ या कालावधीत तो जंजिऱ्याचा नबाब होता, तर सिद्दी खैरियत खान हा याकुतखानाचा भाऊ १६७७ ते १६९६ जंजिऱ्याचा प्रशासक असल्याचा उल्लेख सापडतो.

## भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा

# आज पहिला टी-२० सामना




**डर्बन : वृत्तसंस्था**
ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच सामन्यांची टी-२० मालिका मायदेशी जिंकल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ आता दक्षिण आफ्रिकेच्या मोठ्या दौऱ्यावर गेला आहे. भारताला आफ्रिकेत तीन टी-२०, तीन एकदिवसीय आणि दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळायची आहे. या मालिकेला रविवार (दि. १०)पासून टी-२०ने सुरुवात होणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी प्रत्येक फॉरमॅटसाठी वेगवेगळे कर्णधार नियुक्त केले आहेत. टी-२० संघाचे नेतृत्त्व सूर्यकुमार यादव करणार आहे. वनडे संघाची जबाबदारी केएल राहुलच्या खांद्यावर असणार आहे, तर कसोटी संघाचे कर्णधारपद अनुभवी रोहित शर्माकडे असणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोन्ही सिनियर खेळाडूंनी काही काळासाठी व्हाईट बॉल क्रिकेटमधून ब्रेक घेतला आहे. त्यामुळे हे दोघेही केवळ कसोटी सामना खेळणार आहेत, तर मराठमोळ्या ऋतुराज गायकवाडला तिन्ही मालिकांमधील संघात संधी मिळाली आहे. या दौऱ्याची सुरुवात तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेने होणार आहे. यानंतर तीन एकदिवसीय सामने खेळवले जातील आणि शेवटी दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाईल. उभय संघांतील पहिला टी-२० सामना १० डिसेंबर रोजी डर्बन येथे खेळला जाणार आहे.

## अंडर १९ आशिया चषक स्पर्धा

# अफगाणिस्तानला नमवून भारताची विजयी सलामी

**दुबई : वृत्तसंस्था**
दुबईत सुरू असलेल्या १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाने चांगली सुरुवात केली आहे. पहिल्याच सामन्यात भारताने अफगाणिस्तानवर सात गडी राखून मात केली. या सामन्यात अफगाणिस्तानने भारतासमोर १७४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारताने हे आव्हान ३७.३ षटकांत तीन गड्यांच्या बदल्यात पूर्ण केले. अर्शीन कुलकर्णीने अष्टपैलू खेळी करीत संघाला विजय मिळवून दिला.




भारतीय संघाचा कर्णधार उदय सहारन यांनी नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर निर्धारित ५० षटकांमध्ये भारताने अफगाणिस्तानला १७३ धावांवर रोखले. भारताकडून अर्शीनने आठ षटकांत २९ धावा देत तीन बळी घेतले. राज लिंबानी याने १० षटकांत ४८ धावा देत दोन बळी घेतले. नमन तिवारीने दोन गडी बाद केले, तर मुरुगन अभिषेक आणि मुशीर खान यांनी प्रत्येकी एक गड्याला तंबूत धाडले. अफगाणिस्तानकडून जमशेद जादरान याने सर्वाधिक ४३ धावांची खेळी केली.

भारतीय संघाकडून अर्शीन कुलकर्णी याने सर्वाधिक ७० धावांची खेळी केली. त्याला मुशीर खानने नाबाद ४८ धावांची खेळी करीत साथ दिली.

### सोलापूरच्या अर्शीन कुलकर्णीची अष्टपैलू खेळी

भारताच्या पहिल्याच सामन्यात अर्शीन कुलकर्णीने अष्टपैलू खेळी केली.



सोलापूरच्या अर्शीनने यापूर्वी महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्यामुळे आशिया चषक स्पर्धेत या अष्टपैलू खेळाडूवर सर्वांचे लक्ष असेल. अर्शीन असाच खेळत राहिला, तर लवकरच त्याच्यासाठी टीम इंडियाचे (वरिष्ठ संघ) दरवाजे उघडतील अशी आशा त्याच्या चाहत्यांना आहे.

## आंतर महाविद्यालय महिला इनडोअर क्रिकेट निवड चाचणी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**
महाइनडोअर क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने महामुंबई इनडोअर क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे आंतर महाविद्यालय इनडोअर क्रिकेट स्पर्धा १७ डिसेंबर रोजी आयोजित करणार असल्याची घोषणा केली आहे. ही निवड चाचणी स्पर्धा दादारच्या अर्बन स्पोर्ट्स टर्फ, पार्क क्लब येथे होईल.

प्रथम येणाऱ्या पहिल्या आठ महिला संघांना प्राधान्याने या स्पर्धेत प्रवेश दिला जाणार असून स्पर्धेत मुंबई शहरातील नामांकित महाविद्यालये सहभागी होण्यासाठी उत्सुक आहेत. या स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंमधून मुंबई व महाराष्ट्राचा प्राथमिक संघ निवडला जाणार असून पुढे महाराष्ट्राचा अंतिम संघाची निवड केली जाईल. तो संघ राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होणार आहे.

# इंडियन डॉक्टर ऑलिम्पिकमध्ये डॉ. दामिनी बागुल यांना सुवर्णपदक




**पनवेल : रामप्रहर वृत्त**
यंग डॉक्टर्स लीग फाउंडेशनतर्फे इंडियन डॉक्टर ऑलिम्पिकचे आयोजन पुण्यात करण्यात आले होते. यामध्ये पनवेल येथील डॉ. दामिनी पुंडलिक बागुल यांनी ३५ वर्षांखालील गटात गोळाफेक आणि लॉन टेनिस एकेरीत सुवर्णपदक पटकाविले.

या स्पर्धेत १५००हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व डॉ. विश्वजित कदम यांच्या हस्ते झाले.

डॉ. दामिनी बागुल यांनी यापूर्वीही विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश मिळविलेले आहे. इंडियन डॉक्टर ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकल्याबद्दल त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# लौजी प्रीमियर लीगचे शानदार उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**
खोपोली नगरपालिका हद्दीतील लौजी येथे आयोजित लौजी प्रीमियर लीग या तीन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील व माजी नगराध्यक्ष सुनील पाटील यांच्या हस्ते झाले.



या वेळी मनोगत व्यक्त करताना अश्विनी पाटील यांनी, तरुणाईने मैदानी खेळात भाग घेताना भविष्याचा विचार करता युपीएससी व एमपीएससी परीक्षेत यश मिळवून शासकीय सेवेत दाखल व्हावे, असा बहुमत सल्ला दिला. या वेळी त्यांनी आपल्या महाविद्यालयीन काळातील खेळांच्या स्पर्धेतील काही आठवणी जागवल्या.

या स्पर्धेत आठ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन झाल्यावर सलामीच्या दोन्ही संघांची ओळख मान्यवरांनी करून घेतली. त्यानंतर सामना सुरू झाला.

गावातील स्वराज्य थरकुडे या विद्यार्थ्यांची १४ वयोगटातील क्रिकेटपटूंमध्ये राज्य पातळीवर निवड झाल्याबद्दल त्याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# लांब उडीमध्ये अनिष्का सावंत प्रथम



**अलिबाग : प्रतिनिधी**
रायगड जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग व डॉ. नंदकुमार जाधव फाउंडेशन नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत अलिबागच्या राजमाता जिजाऊ विद्यालयातील विद्यार्थिनी अनिष्का योगेश सावंत हिने लांब उड्डीमध्ये प्रथम क्रमांक पटकविला.

स्पर्धा नवीन पनवेल येथील के. आ. बांठिया विद्यालयाच्या क्रीडांगणावर ६ ते १२ वयोगटात झाली. यामध्ये अनिष्का सावंतने चमकदार कामगिरी करीत लांब उडीत प्रथम क्रमांक मिळविला.

याबद्दल विद्यालयाच्या मुख्यालय व शिक्षकांनी तिचे अभिनंदन केले, तसेच अलिबाग मुरूड फोटोग्रॉफर असोसिएशन अध्यक्ष व पदाधिकारी तसेच विविध स्तरांतील मंडळीने तिचे कौतुक केले.

## मुरूड येथे वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

# ‘मोबाईलच्या जमान्यात मैदानी खेळांकडे दुर्लक्ष नको’

**मुरूड : प्रतिनिधी**
जीवनात खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण असून खेळाडूंनी मोबाईलच्या जमान्यात मैदानी खेळाकडे दुर्लक्ष न करता समरस होऊन खेळाचा आनंद लुटावा, जेणेकरून शारिरीक, बौद्धिक, मानसिक विकास होईल, असे आवाहन माजी मुख्याध्यापक प्रवीण चौलकर यांनी केले.

हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदिर, मुरूड येथे आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करताना चौलकर बोलत होते. या वेळी ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप जोशी, ओंकार विद्या मंदिर अध्यक्ष दीपाली जोशी, प्रमुख अतिथी जिल्हा बँकेच्या संचालिका प्रीता चौलकर, विश्वस्त मनोहर गुरव, उपमुख्याध्यापिका अश्विनी पाटील, शिक्षक उपस्थित होते.

या वेळी प्रीता चौलकर यांनी ओंकार विद्यामंदिरात केलेल्या संस्कारांच्या शिदोरीमुळे चांगले विद्यार्थी घडून ते आज मोठ्या पदांवर कार्यरत असल्याचा अभिमान वाटतो, असे सांगून शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक दीपाली जोशी यांनी केले, तर आभार अश्विनी पाटील यांनी मानले.

या वेळी पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे क्रीडा स्पर्धेत सहभागी आणून रंगत आणली.























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com